साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीग्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०७.०५.२०२६ | अंक नं. ०३१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# सुरु झाली पावसाळ्याची घाई; तरी महापालिकेला पूर्ण होईना नालेसफाई

## नगरसेवकांमध्ये नाराजी, महापालिकेवर ढिसाळ कामकाजाचे आरोप

नगर - शहराजवळूनच सीना नदी वाहत असून, दरवर्षी पुराचे पाणी अनेक लोकांच्या घरात घुसते. त्यामुळे शहरातील नदी, नाल्यांची सफाई ही पावसाळ्यापूर्वी करावी, अशी दरवर्षीच मागणी होते. शासनानेही पावसाळ्यापूर्वी नदी नाल्याची स्वच्छता मोहिम राबविण्याचे निर्देश दिलेले आहेत. अनेक नगरसेवक देखील नालेसफाईची मागणी करीत आहेत. पावसाळा तोंडावर आलेला असतानाही अद्याप शहरातील नदी, नाल्याची सफाई पूर्ण झालेली नाही. सीना नदीतील झाडे, झुडपे आणि पानगवत मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. त्यामुळे सीना नदी अद्याप तुंबलेलीच आहे. त्यामुळे नगरसेवकांसह नागरिकांमध्ये महापालिकेच्या कारभारावर नाराजी व्यक्त होत आहे. महापालिकेच्या ढिसाळपणामुळे पुन्हा पूर परिस्थिती उद्भवण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

शहरातील अनेक नाले बुजविण्यात आले असून, काही नाले अरुंद झाले आहेत. त्यामुळे पाण्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण होत आहेत. याबाबत महापालिकेकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या. मात्र अद्याप त्यांची दखल घेण्यात आली नाही. सध्या जे नाले अस्तित्वात आहेत, त्यांची तरी पावसाळ्यापूर्वी स्वच्छता व्हावी, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे. या नदी, नाल्यांतील झाडे, झुडपे, कचरा आणि गाळ काढून प्रवाह मोकळा केल्यास पाणी अडणार नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, पावसाळा अवघ्या महिन्यावर येवून ठेपला आहे. पुढे अवकाळी पाऊस सुरु होईल. अवकाळी पाऊस सुरु झाल्यानंतर महापालिकेची नालेसफाई मोहिम ठप्प होणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे पुन्हा पुरस्थिती उद्‌भवू शकते, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

महापालिका हद्दीत सुमारे १४ किलोमीटर सीना नदीचा प्रवाह आहे. या सीना नदीचा प्रवाह अडल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात नागरिकांच्या घरात पाणी शिरते. सीना नदीतील गाळ काढण्यासाठी आणि स्वच्छता करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाल्याचे सांगण्यात येते. तथापि पावसाळा तोंडावर आलेला असतानाही नदीची स्वच्छता मोहिम हाती घेण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

### शहरात पुन्हा पुराचा धोका; नगरसेवकांनी सुनावले खडेबोल

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १७ मध्ये गेल्या ३-४ वर्षांपासून पावसाळ्यात गंभीर पूरस्थिती निर्माण होत असून नागरिकांच्या घरात २ ते ३ फूट पाणी शिरत आहे, अशी व्यथा मांडत प्रभाग क्र. १७ चे नगरसेवक मयुर बांगरे यांनी पावसाळ्यापूर्वी तात्काळ व प्रभावी नालेसफाई करावी, अशी मागणी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. प्रभागातील नालेसफाईचे काम अत्यंत अपुरे व ढिसाळ स्वरूपात होत असून केवळ १ ते २ सफाई कर्मचारी (चेंबर) या कामासाठी कार्यरत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी संबंधित यंत्रणेस कठोर निर्देश देऊन पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी बांगरे यांनी केली आहे. विशेषतः सीना नदीकाठील मल्हार चौक, रेल्वे स्टेशन परिसर, आदर्श गौतम नगर / रोहिदास वाडी आणि कायनेटिक चौक परिसरात परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. याशिवाय अरणगाव रोड परिसरातील सुभद्रा नगर, समर्थ नगर, हनुमान नगर, इंदिरा नगर, केडगावचा जुना व नवीन विकसित भाग तसेच लोंढे मळा येथील मुख्य ओढे व अंतर्गत ड्रेनेज लाईनची सखोल सफाई करणे गरजेचे आहे. नालेसफाई वेळेत न झाल्यामुळे नागरिकांच्या जीवित व मालमत्तेला धोका निर्माण होत असून, ही बाब प्रशासनासाठी लज्जास्पद असल्याचे नगरसेवकांनी नमूद केले आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी यावर ठोस कार्यवाही न झाल्यास निर्माण होणाऱ्या पूरस्थितीला आणि नागरिकांच्या रोषाला सर्वस्वी मनपा प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा मयुर बांगरे यांनी दिला आहे.

### भिंगार नाला, रासनेनगर, गजराज फॅक्टरी परिसरातील सफाई पूर्ण

महापालिकेची सध्या सुरु असलेली नालेसफाई मोहिम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याचे दिसते. महापालिकेच्यावतीने *(छायाचित्र व मजकूर पान २ वर)*

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
स्पेशल आमरस 400/- किलो
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
कापड बाजार, अहिल्यानगर.



Up to 50% DISCOUNT
बाटा
सहकार सभागृहा समोर, माळीवाडा बसस्टॅण्ड, अहिल्यानगर




आपलं घर किंवा ऑफिस येथे असावे असे प्रत्येकाचं स्वप्न असते असा
सावेडीतील गुलमोहर रोडवरील एक प्राईम प्रोजेक्ट
आमची वैशिष्ट्ये :
1) 2 व 3 बीएचके लक्झरियस फ्लॅट्स
2) प्राईम लोकेशन
3) ग्राऊंड फ्लोअरवर शॉप्स उपलब्ध
4) सर्व सुविधांनी परिपूर्ण प्रकल्प
साईटचा पत्ता : गुलमोहर रोड, आम्रपाली गार्डन शेजारी, सावेडी, अहिल्यानगर
अधिक माहितीसाठी संपर्क - 9545453867

पाचवे पुण्यस्मरण



कै.श्री. अंबादास बाबुराव पंगुडवाले
स्व.दि. ०७/०५/२०२१ (जेष्ठ समाजसेवक विविध पुरस्कार भुषण)

वृक्ष सुकला तरी मुळे मातीत असतात,
माणसे गेली तरी आठवणी मनात असतात..

आमचे वडिल कै.श्री. अंबादास बाबुराव पंगुडवाले यांच्या ५ व्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !
तुमची उणीव आम्हाला प्रत्येक पावलावर भासते..

शोकाकुल : समस्त पंगुडवाले परिवार

शोरुम भाड्याने देणे आहे
सराफबाजार, गंजबाजार, अहिल्यानगर येथे ४ मजली, बेसमेंट सहीत
फर्निचर, टॉयलेट व पार्किंगसह सुसज्ज ईमारत
व्यवसाय वाढवण्यासाठी उत्तम संधी
- शोरुमसाठी त्वरीत संपर्क साधा -
मो. 9822550707

मयुरी लेडिज मॉलसाठी कामासाठी गरजू मुली/महिला पाहिजेत
कामाची वेळ : सकाळी ९.३० ते सायंकाळी. ८.३० पार्ट टाईमपण चालेल
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर
Mo. 9823268658

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पोलीस महासंचालकांच्या आदेशाला नगर पोलिसांकडून केराची टोपली

## खून प्रकरणातील आरोपींना अभय देणाऱ्या हवालदारावर कारवाईची मागणी

नगर – राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी दिलेल्या आदेशांचे अहिल्यानगर पोलीस दलात उल्लंघन होत असल्याचा आरोप नेवासा तालुक्यातील गंगानगर येथील प्रकाश एकनाथ शेंडगे यांनी केला आहे. निलेश शेंडगे यांच्या खून प्रकरणातील मुख्य संशयितांना मदत केल्याचा ठपका ठेवून पोलीस हवालदार शंकर संपतराव चौधरी यांची पोलीस मुख्यालयात बदली करण्यात आली होती. मात्र, ही बदली केवळ नावापुरतीच असून चौधरी अद्यापही श्रीरामपूर परिसरात सक्रिय असल्याची तक्रार पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी या प्रकरणात कडक कारवाईचे आश्वासन दिले होते. मात्र, हवालदार शंकर चौधरी हा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने अद्यापही अवैध गुटखा रॅकेट चालवत असून, वसुलीची कामे पाहत असल्याचा गंभीर आरोप अर्जात केला आहे. विशेष म्हणजे, सदर खुनाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात येऊनही अद्याप एकाही आरोपीला अटक झालेली नाही. उलट, फिर्यादी प्रकाश शेंडगे आणि त्यांच्या कुटुंबीयांना गुन्हा मागे घ्या, अन्यथा तुमचाही खून करू अशा धमक्या दिल्या जात असल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हवालदार चौधरी याला मुख्यालयात नेमकी काय ड्युटी दिली जात आहे, याची सखोल चौकशी करून त्याला तातडीने निलंबित अथवा बडतर्फ करावे, अशी विनंती शेंडगे यांनी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना दिलेल्या पत्रात केली आहे.

# जन्म दाखले देण्यासाठी ३ हजाराची लाच घेताना नगर परिषदेच्या २ कर्मचाऱ्यांना रंगेहाथ पकडले

जामखेड – मुलगा व मुलीचा जन्मदाखला काढून देण्यासाठी तक्रारदाराकडून ३ हजारांची लाच घेताना जामखेड नगरपरिषदेच्या २ कर्मचाऱ्यांना नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. नगरपरिषद कार्यालय परिसरात ६ मे रोजी दुपारी ही कारवाई करण्यात आली आहे.

जन्म मृत्यु नोंदणी विभागातील लिपिक अभिजीत जालिम भैसडे (वय ३९, रा. तपनेश्वर गल्ली, मारूती मंदिरासमोर, जामखेड) व अग्निशामक दलातील मदतनीस (कंत्राटी) अहमद इलियास शेख (वय ४३, रा. काझी गल्ली, मस्जिद समोर, खर्डा रोड, जामखेड) अशी गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

सविस्त माहिती अशी की, तक्रारदार यांनी २६ नोव्हेंबर २०२५ रोजी जामखेड नगरपरिषद येथे त्यांचा मुलगा व मुलगी यांचे जन्म दाखला मिळणे करीता आवश्यक कागदपत्र जोडुन अर्ज दिला होता व मुलांचा जन्म दाखला मिळणे कामी त्यांनी लोकसेवक भैसडे यांची भेट घेतली होती. त्यावेळी लोकसेवक भैसडे यांनी लोकसेवक शेख यांना संपर्क करण्यास सांगितले असता त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लोकसेवक भैसडे यांचे सांगणेवरून लोकसेवक शेख यांना संपर्क केला असता लोकसेवक शेख हे तक्रारदार यांचेकडे दोन्ही मुलांचा जन्मदाखला देण्याकरीता लोकसेवक भैसडे यांचेकरीता प्रत्येक दाखल्याचे १५०० रूपये याप्रमाणे दोन जन्म दाखल्यांचे ३,००० रूपये लाचेची मागणी करत असल्याची तकार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात ५ मे रोजी प्राप्त झाली होती.

या तक्रारी नुसार ६ मे रोजी दुपारी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. त्यावेळी शेख याने भैसडे यांचे यांच्या साठी ३ हजाराची लाच मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर नगरपरिषद समोर सापळा लावण्यात आला त्यावेळी शेख यास तक्रारदाराकडून ३ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. या स्विकारलेल्या लाच रक्कमेस लोकसेवक भैसडे यांनी समती दर्शवुन लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे दोघांच्या विरुद्ध जामखेड पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अ, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस उप अधिक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजु आल्हाट, पो.ना. चंद्रकांत काळे, पो.कॉ. किशोर कुळधर, पो. कॉ. शेखर वाघ, चालक पो.हे.कॉ. दशरथ लाड यांच्या पथकाने केली आहे.

# महापालिकेला पूर्ण होईना नालेसफाई

(पान १ वरुन)

भिंगार नाला, रासनेनगर, गजराज फॅक्टरी परिसरातील नालेसफाई पूर्ण झाली आहे. धर्माधिकारी मळा पंपिंग स्टेशन ते विहीर या परिसरातील नाल्याची दोन्ही बाजूंनी सफाई करण्यात आली असून हा प्रवाह आता मोकळा झाला आहे. तसेच भिंगार नाला परिसरातील व्हिडिओकॉन पूल ते भोसले लॉन या पट्ट्यातही स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. याशिवाय पोलीस मुख्यालय परिसर, कानडे मळा, एमएसईबी वसाहत, पोलीस कॉलनी, एल अँड टी वसाहत, रासने नगर आणि मोकाशी वस्ती या परिसरातील नाल्यांमधील साचलेला गाळ आणि कचरा काढून नालेसफाईची कामे मार्गी लावली आहेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील सर्व मुख्य नाले आणि अंतर्गत ड्रेनेज लाईन स्वच्छ करून पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा, यावर प्रशासनाने लक्ष केंद्रीत केले असल्याचे महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी रिझवान शेख यांनी सांगितले.



शहरातील धर्माधिकारी मळा परिसरात सुरु असलेली नालेसफाई.

# नगर जिल्ह्यातून हद्दपार केलेल्या दोघा सराईत गुन्हेगारांना पकडले

## हद्दपारी आदेशचा भंग करून लपून छपून जामखेडमध्ये करत होते वास्तव्य



नगर – नगर जिल्ह्यातून हद्दपार केलेले असतानाही या आदेशाचा भंग करून लपून छपून जामखेडमध्ये वास्तव्य करत असलेल्या २ सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. सोनु कुंदन वाघमारे (वय ३४, विक्रम भगवान डाडर (वय ३७, दोघे रा. आरोळे वस्ती, जामखेड) अशी या आरोपींची नावे आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ६ मे रोजी जिल्हयातील हद्दपार करण्यात आलेल्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांचा जामखेड शहरामध्ये शोध घेत असतांना पथकास हद्दपार इसम सोनु कुंदन वाघमारे, विक्रम भगवान डाडर हे हद्दपार आदेशाचा भंग करून विनापरवाना जामखेड शहरात आरोळेवस्ती येथील शेतामध्ये बसलेले असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर माहितीचे आधारे पथकाने या दोघांना आरोळेवस्ती येथून ताब्यात घेतले.हद्दपार अभिलेखाची खात्री करता त्यांना १३ फेब्रुवारी २०२५ पासुन २ वर्षाकरिता अहिल्यानगर जिल्ह्यामधुन हद्दपार केलेले असल्याचे समोर आले. त्यामुळे या दोघांवर पो.कॉ.सुनिल मालणकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जामखडे पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगर जिल्ह्यामध्ये हद्दपार केलेले इसम विनापरवाना वास्तव्य करत असल्याचे दिसुन आल्यास स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर येथील फोन नंबर ०२४१–२४१६१११ किंवा डायल ११२ यावर कळविण्यात यावे असे आवाहन पोलिसांतर्फे करण्यात आले आहे.

# इंदोरीकर महाराजांच्या मुलीच्या लग्नात महिलांच्या दागिन्यांची चोरी

## २ आरोपींना २ लाख ८९ हजारांच्या मुद्देमालासह 'एलसीबी' पथकाने पकडले



नगर – इंदोरीकर महाराजांच्या मुलीच्या लग्नात मोठ्या प्रमाणावर झालेल्या गर्दीचा फायदा घेत लग्नासाठी आलेल्या महिलांच्या गळ्यातील दागिने चोरणाऱ्या २ चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले असून त्यांच्या कडून चोरीचा २ लाख ८९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

इंदोरीकर महाराजांच्या मुलीचा विवाह सोहळा संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी येथील बाळासाहेब गुंजाळ पाटील मळा येथे ३ मे रोजी सायंकाळी पार पडला. या वेळी मोठी गर्दी झाली होती. या गर्दीत चोरट्यांनी डाव साधत सुनिता नामदेव सरोदे व शैला वसंत जाधव यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरले होते. याबाबत संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास व्यवसायिक कौशल्याचे आधारे सदरचा गुन्हा हा रेकॉर्डवरील आरोपी सागर सुरेश कांबळे याने त्याचे साथीदारासह केला असुन तो त्याचे साथीदारासह चोरी केलेल्या सोन्याची वाटणी करण्यासाठी मोटार सायकलवर ममदापुर फाटा येथे येणार असल्याची माहिती प्राप्त झाली.

पथकाने तात्काळ ममदापुर फाटा येथे जावुन सापळा रचुन सागर सुरेश कांबळे (वय ३२, रा. रमानगर, वार्ड नं.१, श्रीरामपुर), बबलु उर्फ अब्दुल इब्राहिम पिंजारी (वय ३६, रा. वार्ड नं.२, श्रीरामपुर) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडे गुन्ह्याचे अनुषंगाने विचारपुस करता त्यांनी सदरचा गुन्हा इतर साथीदार आतिक आयुब उर्फ आरीफ शेख (रा. वार्ड नं. २, श्रीरामपुर), सनी विलास ढोकणे (रा.वार्ड नं.२, श्रीरामपुर) अशांनी मिळुन केल्याची कबुली दिली आहे. आरोपींच्या ताब्यातून १ लाख ४९ हजार ५०० रुपये किंमतीचे ११.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे, ७० हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल, ७० हजार रुपये किंमतीची मोटार सायकल असा एकुण २ लाख ८९ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यातील आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी संगमनेर शहर पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आलेले असुन तपास संगमनेर शहर पोलीस ठाणे करीत आहे.

# सराफ मारहाण प्रकरणी दोषी पोलिसांवर कारवाई करावी

## पद्मश्री अण्णा हजारे यांची मागणी

नगर – पोलिस अधिकाऱ्यांनी कायद्याचे उल्लंघन करून सराफ व्यावसायिकांवर अन्याय केल्यास कोणत्याही परिस्थितीत सहन करू नये, असे स्पष्ट करतानाच सराफांना पोलीस ठाण्यात झालेल्या मारहाण प्रकरणात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष घालून पोलिसांची प्रतिमा मलीन होणार नाही, याची काळजी घ्यावी, असा सल्ला समाजसेवक अण्णा हजारे यांनी पोलिसांना दिला.

शेवगाव तालुक्यातील बोधेगावचे सराफ व्यवसायिक भागवत आधापुरे यांना कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेऊन अमानुष मारहाण करणाऱ्या कोतवाली पोलीस अधिकारी गणेश देशमुख व कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करून कारवाई करावी, या मागणीसाठी सराफ सुवर्णकार संरक्षण समितीने पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर २८ एप्रिलपासून बेमुदत उपोषण सुरु केले आहे. त्या उपोषणाचा आज सातवा दिवस असून वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी दखल घेतली नाही. दरम्यान संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अण्णा हजारे यांची भेट घेऊन निवेदन देत, या प्रकरणात लक्ष घालण्याची मागणी केली.



सराफ मारहाण प्रकरणी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची सराफ सुवर्णकार संरक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली.

यावेळी सराफ सुवर्णकार संरक्षण समितीचे संस्थापक काकासाहेब बुऱ्हाडे, गणेश टाक, ओंकार गटगीळे, अक्षय शहाणे, भागवत आधापुरे, गजानन शहाणे उपस्थित होते.

शिष्टमंडळाशी बोलताना हजारे म्हणाले की, संबंधित घटनेत सराफ बांधवांवर झालेला अन्याय अत्याचार, सराफ समितीच्या पदाधिकाऱ्यांना कस्टडीत झालेली मारहाण, सराफांकडून बेकायदेशीर होणाऱ्या रिकवरी, आणि पोलिसांची खाकी वर्दी मध्ये असणारे गुंडगिरी मुळे सर्वसामान्य जनतेत पोलिसांची विश्वासार्हता कमी होईल. त्यासाठी वरिष्ठ पोलिसांनी यामध्ये लक्ष घालून पोलिसांप्रती जनतेचा असलेला विश्वास कसा वाढेल, तो व्यवस्थित कसा होईल, यासंदर्भात पोलिसांनी विचार करायला हवा. यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

दरम्यान कोतवाली पोलीस ठाण्यात घडलेल्या घटनेची शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे चौकशी करीत आहेत. ते लवकरच पोलीस अधीक्षकांना चौकशी अहवाल सुपूर्त करणार आहेत.

# नगर रेल्वे स्टेशनवरून ५० वर्षीय व्यक्ती बेपत्ता



मदन सोलंकी

नगर– शनी शिंगणापूर येथे दर्शनासाठी आलेल्या पंजाबमधील एका ५० वर्षीय व्यक्तीचा अहिल्यानगर रेल्वे स्टेशनवरून बेपत्ता झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, पंजाब राज्यातील राजिंदर दीवानचंद सांगवाल (वय ३२) हे आपल्या पत्नी पिंकी व शेजारी मदन मतुराम सोलंकी (वय अंदाजे ५०) यांच्यासह ३० एप्रिल रोजी शनी शिंगणापूर येथे दर्शनासाठी आले होते. १ मे २०२६ रोजी दुपारी दर्शन आटोपून ते तिघेही नगर रेल्वे स्टेशनवर पंजाबकडे जाणाऱ्या ट्रेनची वाट पाहत होते. रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास ट्रेन आल्यावर मोठ्या गर्दीत ते ट्रेनमध्ये चढले. मात्र, ट्रेन सुरू झाल्यानंतर काही वेळाने मदन सोलंकी हे दिसेनासे झाल्याचे सांगवाल यांच्या लक्षात आले.

प्रवाशांकडे चौकशी केली असता काहींनी संबंधित व्यक्ती ट्रेन सुटत असताना खाली उतरल्याचे सांगितले. पुढील स्टेशनवर उतरून सांगवाल दाम्पत्य पुन्हा नगर येथे आले व शोध घेतला. रेल्वे स्टेशनवरील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता मदन सोलंकी हे मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर जाताना दिसून आले. यानंतर सांगवाल दाम्पत्याने रेल्वे परिसर, शहर व नातेवाईकांकडे शोध घेतला, मात्र ते कुठेही आढळून आले नाहीत. त्यामुळे त्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.बेपत्ता व्यक्तीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलीसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मंजुळाबाई आंबेकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – भिस्तबाग चौक, सावेडी येथील रहिवासी श्रीमती मंजुळाबाई त्र्यंबक आंबेकर (वय ९६) यांचे ७ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## चंपालाल मुनोत यांचे अल्पशा आजाराने निधन



कर्जत – कर्जत येथील रहिवासी चंपालाल कचरदास मुनोत (वय ८१) यांचे ७ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कर्जत अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, नातवंडे, जावई असा परिवार आहे. प्रविण मुनोत यांचे वडील, सारसनगर (अ.नगर) येथील राहुल भंडारी यांचे ते सासरे होत.

## लिलाकांत गायकवाड यांचे दु:खद निधन



नगर – माणिकदौंड येथील ज्येष्ठ नागरिक लिलाकांत हरिभाऊ गायकवाड (वय ७२) यांचे ६ मे रोजी सायंकाळी ९ वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रपरिवार असा आप्तस्वकीयांचा परिवार आहे. माणिकदौंड येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

श्री. गायकवाड हे शांत, संयमी आणि मनमिळावू स्वभावासाठी ओळखले जात होते. त्यांनी आपल्या आयुष्यात सामाजिक बांधिलकी जपत विविध कार्यात सक्रिय सहभाग नोंदवला होता.

# १ लाख वृक्ष लागवडीसाठी प्रशासन सज्ज; नगरकरांनी लोकचळवळीत सहभागी व्हावे

## उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचे आवाहन; 'ग्रीन सिटी'साठी मनपाची तयारी, 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहिमेबाबत उद्यान विभागाची नियोजन बैठक

नगर – अहिल्यानगर शहराला हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या दृष्टीने राबविण्यात येत असलेल्या 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहिमेची तयारी आता वेगाने सुरू झाली असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने नियोजनाला गती दिली आहे. अहिल्यानगर महानगरपालिका आणि साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वाकांक्षी मोहिमेअंतर्गत शहरात एक लाख झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या उद्यान विभागाची नियोजन बैठक आयुक्त यशवंत डांगे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.



अहिल्यानगर महानगरपालिका आणि साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'ग्रीन सिटी' या महत्त्वाकांक्षी मोहिमेच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या नियोजन बैठकीत आयुक्त यशवंत डांगे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव. (छाया – लहू दळवी)

या बैठकीस उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, ग्रीन सिटी मोहीम समिती सदस्य कैलास दिघे, हर्षल आगळे, इंजिनिअर प्रताप काळे यांच्यासह उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान आयुक्त यशवंत डांगे यांनी उद्यान विभागाचा सविस्तर आढावा घेत शहरातील विविध भागांमध्ये वृक्षारोपणासाठी योग्य जागांची निवड, झाडांच्या प्रजाती, संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना आणि दीर्घकालीन देखभालीबाबत विविध सूचना दिल्या. शहरातील उद्याने, रस्त्यांच्या दुतर्फा जागा, मोकळी मैदाने आणि सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी उपमहापौर धनंजय जाधव यांनी पर्यावरण संवर्धनाच्या गरजेवर भर देत सांगितले की, जागतिक पर्यावरण दिन आला की अनेक ठिकाणी वृक्षारोपण केले जाते; मात्र त्यानंतर त्या झाडांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होते. केवळ फोटोसेशनसाठी झाडे लावून उपयोग नाही, तर ती जगविणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे 'ग्रीन सिटी' ही केवळ मोहिम नसून शहराच्या भविष्यासाठी सुरू केलेली लोकचळवळ आहे. ते पुढे म्हणाले की, अहिल्यानगर शहर दिवसेंदिवस विकसित होत असताना पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे झाले आहे. वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि कमी होत चाललेली हरितक्षेत्रे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण आणि संवर्धनासाठी पुढे येणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सहभागाशिवाय ही मोहीम यशस्वी होऊ शकत नाही. शहरातील प्रत्येक प्रभाग, संस्था, सामाजिक संघटना, युवक आणि विद्यार्थ्यांनी या मोहिमेत सहभागी होऊन हरित नगर घडविण्यासाठी योगदान द्यावे.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी उद्यान विभागालाही विशेष सूचना देत सांगितले की, महानगरपालिकेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे आदर्श काम उभे करायचे आहे. प्रत्येक लावलेले झाड जगले पाहिजे, यासाठी योग्य नियोजन, पाणीपुरवठा आणि नियमित देखभाल आवश्यक आहे. या मोहिमेमुळे महापालिकेचा नावलौकिक वाढेल आणि भविष्यात अहिल्यानगर शहर 'ग्रीन सिटी' म्हणून राज्यात ओळखले जाईल.

या मोहिमेअंतर्गत शहरात विविध प्रकारची सावलीची, फळझाडे, औषधी वनस्पती आणि पर्यावरणपूरक वृक्ष मोठ्या प्रमाणात लावण्यात येणार असून त्यांचे संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत राहणार आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच वृक्षारोपण मोहिमेला प्रत्यक्ष प्रारंभ होणार असून प्रशासनाने त्यासाठी सर्वंकष नियोजन सुरू केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### शरीर ठेवा ठंड...

उन्हाळा सुरू झाला की वाढत्या तापमानाचा परिणाम आपल्या शरीरावर आणि आरोग्यावर लगेच जाणवू लागतो. कडाक्याचे ऊन, अंगाची होणारी लाहीलाही आणि घामामुळे निघणारे पाणी यामुळे शरीरातील ऊर्जेची पातळी कमी होते. शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवणे हा सर्वात महत्त्वाचा उपाय आहे. तहान लागण्याची वाट न पाहता दर तासाला पाणी प्या. शहाळ्याचे पाणी शरीरातील इलेक्ट्रोलाइट्स संतुलित राखते. तसेच ताक, लिंबू सरबत आणि पन्हे यांमुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. फ्रीजमधील अतिशय थंड पाणी पिण्यापेक्षा मातीच्या माठातील पाणी पिणे आरोग्यासाठी अधिक फायदेशीर ठरते. उन्हाळ्यात पचनसंस्थेवर ताण येतो, म्हणून आहार हलका असावा. टरबूज, खरबूज, काकडी आणि संत्री यांचा आहारात समावेश करा. जेवणामध्ये दह्याचा वापर केल्याने पोटाला थंडावा मिळतो आणि पचनक्रिया सुधारते. जास्त तिखट पदार्थ शरीरातील उष्णता वाढवतात, त्यामुळे ते टाळलेलेच बरे. उन्हाळ्यात सुती आणि सैल कपडे घालण्याला प्राधान्य द्या. यामुळे घाम लवकर शोषला जातो आणि त्वचेला हवा लागते.

## पाककला

### पौष्टिक भरली चपाती

**साहित्य :** गव्हाचं पीठ – २ कप, मीठ – चिमूटभर, पाणी – लागेल तसं, स्टफिंग उकडलेले बटाटे – २, कांदा – १ (बारीक चिरलेला), हिरवी मिरची – १–२, हळद – १/२ टीस्पून, तिखट – १ टीस्पून, गरम मसाला – १/२ टीस्पून, कोथिंबीर – थोडी, मीठ – चवीनुसार

**कृती :** सर्वात आधी पीठ मळून घ्या. गव्हाचं पीठ, मीठ आणि पाणी घालून मऊ कणिक मळा १०–१५ मिनिटं झाकून ठेवा आता स्टफिंग तयार करण्यासाठी बटाटे मॅश करा. त्यात कांदा, मिरची, मसाले, मीठ आणि कोथिंबीर मिसळा. आता कणकेचा गोळा घ्या आणि थोडा लाटून घ्या मध्ये स्टफिंग ठेवा आणि व्यवस्थित बंद करा, हलक्या हाताने लाटून तव्यावर भाजा दोन्ही बाजूंनी तेल/तूप लावून सोनेरी होईपर्यंत शेकून घ्या. तर चला तयार आहे आपली भरली चपाती रेसिपी, दही, लोणचं किंवा बटरसोबत नक्कीच टिफिनमध्ये द्या. तुम्ही पनीर स्टफिंग, मिक्स व्हेज स्टफिंग देखील ट्राय करू शकतात.

## वास्तू

### घरात ठेवा चांदीचा मोर

* ज्योतिष शास्त्रानुसार घरामध्ये चांदीचा मोर ठेवल्याने नकारात्मकता दूर होते आणि सुख–समृद्धी येते. ड्रॉईंग रूममध्ये ठेवल्याने व्यक्तीचे अशुभ दूर होते आणि व्यक्तीला प्रत्येक कामात यश मिळते.

* ज्या लोकांच्या वैवाहिक जीवनात कोणत्याही प्रकारची समस्या असेल त्यांनी आपल्या घरात चांदीच्या मोराची जोडी जरूर ठेवावी. असे म्हणतात की, यामुळे जीवनात प्रेम आणि शांती येते. पूजेत चांदीचा वापर करणे खूप शुभ मानले जाते. अशा वेळी चांदीचा मोर घरच्या मंदिरात किंवा पूजास्थळी शांतपणे बसवून ठेवा.

## सौंदर्य

* फाउंडेशन लावल्यानंतर चांगले मिसळा जेणेकरून कोणतीही रेषा किंवा डाग दिसणार नाही. यासाठी ब्लेंडिंग स्पंज किंवा ब्रश वापरा.

* सुरकुत्या लपवण्यासाठी कन्सीलरचा योग्य रंग निवडणे महत्त्वाचे आहे. फाउंडेशनपेक्षा एक शेड हलका कन्सीलर निवडा.

## सल्ला

* कडधान्यांना फ्रीजमध्ये ठेवण्याअगोदर त्यात एक लहान लिंबाचा रस घातल्याने त्याचा वास फ्रीजमध्ये पसरणार नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ८ मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, उ.षा.२१।२० सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित रहाल. घाई करणे अडचणीत टाकू शकते. पैसे कमविण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**वृषभ** : चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपला जोडीदार आपल्या बरोबर राहिल.

**मिथुन** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. मनोरंजनावर खर्च होईल.

**कर्क** : उत्तम भोजनाचे सुख मिळेल. मित्रांपासून आनंद मिळेल. प्रेमसंबंधात यश मिळेल. आपत्यांपासून आनंदप्राप्ती होईल. वाहनसुख मिळेल.

**सिंह** : योजनाबद्धरितीने आपले काम करण्याचा प्रयत्न कराल. कार्य एखाद्यावर विसंबून करणार नाहीत.

**कन्या** : नेहमीपेक्षा अधिक चांगले काही घडण्यासाठी आपणास आपल्या कामात एकाग्रता वाढवण्याची आवश्यकता आहे.

**तूळ** : जुने मित्र मंडळी भेटतील. वाहने व उपकरणे जपून वापरावीत. मानसिक सुख–शांतीचे वातावरण राहील.

**वृश्चिक** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**धनु** : मनोरंजनासाठी वेळ काढाल. एखाद्या कल्पक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता. मित्रांकडून सहयोग मिळेल. व्यापार–व्यवसायात स्थितीत सुधार होईल.

**मकर** : आरोग्य उत्तम राहील. आपल्या हातात आलेल्या संधी निसटू देऊ नका. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. अनुकूल स्थिती मिळेल. प्रसिद्धी मिळेल.

**कुंभ** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. प्रशासकीय कामे पूर्ण होतील. नवीन कार्याचे स्वरूप बनविण्यासाठी वेळ उत्तम.

**मीन** : व्यापार–व्यवसायात स्थिती नरम–गरम राहील. आरोग्य उत्तम राहील व एखाद्या जुन्या मित्राशी भेट होण्याची शक्यता.

## फिल्मीचक्कर क्र. १२३५

सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ३ | ४ | |
| | ■ | ■ | | ■ | ५ | | ■ |
| | ■ | ■ | ६ | | ■ | ७ | |
| ■ | ८ | | | ■ | ९ | | ■ |
| १० | | ■ | ११ | | ■ | | ■ |
| ■ | १२ | | | ■ | १३ | | |
| १४ | | ■ | १५ | १६ | ■ | | ■ |
| | ■ | ■ | ■ | | ■ | १७ | |

**आडवे शब्द :-** १) +++ + +++ + मोहब्बत कभी कभी (गाणे) ५) तौबा ये मत++ चाल (गाणे) ६) ++ मेमसाब (चित्रपटाचे नाव) ७) राजेंद्रकुमार, माला सिन्हा यांचा एक गाजलेला चित्रपट ८) +++खटोलश (चित्रपटाचे नाव) ९) मेरा ++ (चित्रपटाचे नाव) १०) ++ आये बहार आयी (चित्रपटाचे नाव) ११) अंधा ++ (चित्रपटाचे नाव) १२) ++ देशपांडे (एक अभिनेत्री) १३) रास्ते का +++ १४) ++ ही प्यार (चित्रपटाचे नाव) १५) ++ रांझा (चित्रपटाचे नाव) १७) ++ धुपिया (अभिनेत्री)

**उभे शब्द :-** १) सुनील दत्त, नूतन यांचा एक गाजलेला चित्रपट २) दिल + + +++++ (चित्रपटाचे नाव) ३) मरते ++ तक (चित्रपटाचे नाव) ४) नायक म्हणून जितेंद्रचा पहिला चित्रपट ८) मनोजकुमारचा देशभक्तीवर आधारित गाजलेला एक चित्रपट १४) ++ सावन (चित्रपटाचे नाव) १६) एक अभिनेत्री ++ अग्निहोत्री

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** श्रीमंत होण्यासाठी मोठे पॅकेज नाही तर चांगल्या सवयी अंगी बाळगाव्या लागतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आशियातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक किल्ला कुठे आहे?

भारतात अनेक प्राचीन ऐतिहासिक स्थळांचा वारसा लाभलेल्या आहे. देशात अनेक ठिकाणे आहे जे आज देखील इतिहासाची साक्ष देत भक्कमपणे उभी आहे. तसेच भारतात असंख्य प्राचीन गड–किल्ले आहे पण तुम्हाला माहित आहे का भारतातील सर्वात मोठा किल्ला कोणता आहे? माहिती नसेल तर आज आपण जाणून घेणार आहोत.

राजस्थानमधील चित्तोडगड हा भारतातील सर्वात मोठा किल्ला आहे व हा किल्ला हा केवळ भारतातीलच नव्हे तर आशियातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक मानला जातो. त्याचा इतिहास, वैशिष्ट्ये खूप महत्वपूर्व आहे. चित्तोडगड किल्ला त्याच्या विशाल क्षेत्रासाठी, ऐतिहासिक महत्त्वासाठी आणि शौर्यकथांसाठी जगभर प्रसिद्ध आहे. चित्तोडगड किल्ला अंदाजे ७०० एकर परिसरात पसरलेला आहे आणि त्याचा घेर अंदाजे १३ किलोमीटर आहे. हा किल्ला एका उंच टेकडीवर बांधलेला आहे, ज्यामुळे त्याची सुरक्षा अधिक मजबूत झाली. शत्रूंना रोखण्याच्या धोरणात्मक योजनेचा भाग म्हणून किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी सात भव्य दरवाजे बांधण्यात आले होते.

या भव्य किल्ल्यात राजवाडे, मंदिरे, स्मारके आणि जलाशयांसह सुमारे ६५ ऐतिहासिक वास्तू आहे. येथे चार राजवाडे, १९ मंदिरे आणि असंख्य जलस्रोत आहे. तसेच चित्तोडगड किल्ला हा राजपुतांच्या शौर्याचे आणि त्यागाचे प्रतीक मानला जातो. किल्ल्यावर अनेक वेळा हल्ले झाले, प्रत्येक वेळी येथील योद्धे शेवटच्या श्वासापर्यंत लढले. हा किल्ला राणी पद्मिनीच्या बलिदान कथेसाठीही प्रसिद्ध आहे. ही घटना इतिहासातील शौर्य आणि त्यागाचे एक महान उदाहरण मानली जाते. तसेच एवढ्या मोठ्या किल्ल्यात पाणीपुरवठ्याची समस्या उद्भवू नये यासाठी असंख्य जलाशय आणि तलाव बांधण्यात आले होते. असे म्हटले जाते की, या जलस्रोतांमधून हजारो लोकांची गरज भागू शकली असती. चित्तोडगड किल्ला हे केवळ एक ऐतिहासिक स्मारक नाही, तर एक 'जिवंत किल्ला' देखील आहे.

चित्तोडगड किल्ला हे युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आहे. हा राजस्थानच्या डोंगरावरील किल्ल्यांचा एक भाग आहे आणि जगभरातील पर्यटक त्याची भव्यता पाहण्यासाठी येथे येतात.


## मानवी मुल्ये

गुरू गोविंद सिंह जी यांनी बलवान आणि शूर तरुणांचा समावेश करून पहिले शीख सैन्य तयार केले. लाहोरमध्ये गुरु अर्जन साहिब यांच्या बलिदानानंतर, गुरु हरगोबिंद जी सहावे गुरु बनले आणि गुरु गद्दी आरोहण केल्यानंतर, धर्म आणि मानवी मूल्यांचे एक मजबूत पुरस्कर्ते म्हणून उदयास आले. ते पहिले गुरु होते ज्यांनी दोन तलवारी धारण केल्या, त्यापैकी एक धार्मिक शक्तीचे प्रतीक होती आणि दुसरी शाही शक्तीचे.

एकदा मुघल शासक जहांगीरने कपटाने त्यांना कैद केले आणि ग्वाल्हेर किल्ल्यात बंदिवान ठेवले. जहांगीरला त्याची चूक लक्षात आल्यावर त्यांनी गुरुसाहेबांना सोडण्याचा आदेश दिला. गुरुसाहेबांनी एक अट घातली की जेव्हा तेथे आधीच कैदेत असलेले ५२ हिंदू राजे देखील सोडले जातील तेव्हाच ते किल्ल्यातून बाहेर येतील. बंदिवान हिंदू राजांना मुक्त केल्यानंतरच गुरुसाहेब बाहेर आले. अमृतसरला पोहोचल्यावर शिखांनी एक भव्य दीपमाळा आयोजित केली. योगायोगाने, त्या दिवशी दिवाळी होती. तेव्हापासून, श्री हरिमंदिर साहिबमध्ये दिवाळीच्या दिवशी दीपमाळा केली जाते. ती बंदीछोड दिवस म्हणून देखील साजरी केली जाते. नंतर, जोपर्यंत जहांगीर जिवंत होते तोपर्यंत त्यांनी गुरुसाहेबांशी संबंध ठेवले.

तात्पर्य : प्रत्येकाने मानवी मूल्ये जपायला हवी.

## जीवन का अमृत (भाग १)



महकमें के लोग सड़कों को साफ कर देते हैं। अत: काल भगवान किसी को नहीं बख्शेंगे, क्योंकि वे प्रकृति की बागवानी की प्रक्रिया के द्वारा रास्ते को साफ करना चाहते हैं, यानि युद्ध और बीमारियों के जरिये। इसलिए आइए, हम बुरे कर्मों को छोड़ दें और ज्योति के कवच पहन लें ।

अपने दिलों और आत्माओं को प्रभु की याद में लगा दें और सिर पर कार्यरत प्रभु और सत्गुरु में अपनी सारी उम्मीदें रखें। अगर हम एक सदाचारी जीवन जीएँ, तो इन विपत्तियों के आने पर भी हम प्रभावित नहीं होंगे। सदाचारी और भक्त लोगों को लेशमात्र भी चिंता करने की जरूरत नहीं है। दिन गिनती के हैं, एक पुरानी कहावत है। मैं कहूँगा कि जो रोटी हम खाते हैं और जो साँस हम लेते हैं, वे सभी गिनती के हैं। हर इंसान को यह नश्वर शरीर

### नश्वर शरीर

त्यागना है, उसी तरीके से, जो उसके भाग्य में लिखा हो और जो कि पुराने कर्मों पर आधारित होता है, अर्थात् बीमारी द्वारा या दुर्घटना द्वारा। किसी की भी मौत नियत समय से पहले नहीं हो सकती, तो फिर डर कैसा? चाहे हम यह नहीं जानते कि हमारी मौत कैसे होगी, बीमारी से या फिर दुर्घटना द्वारा, पर एक चीज़ पक्की है, कि अगर हम उस समय प्रभु की मीठी याद में खोए होंगे, तो हम शांति से मरेंगे, क्योंकि हमारे सिर पर सत्गुरु की उपस्थिति होगी । केवल एक ही चीज़ की आवश्यकता है कि हर समय प्रभु की मधुर याद बनी रहे। इसलिए हम में अपनी सारी आशाएँ रखें; जहाँ हैं, वहीं रहें और अपनी उन्नति का सत्गुरु ध्यान रखें। अगर कोई विपत्ति आती है, तो भी हम दिल छोटा न करें, बल्कि अपनी बुद्धि का प्रयोग करें और मौके के मुताबिक सर्वोत्तम साधन का सहारा लें। आपको किसी सपने या अफवाह से डरने की जरूरत नहीं। सिर पर कार्यरत गुरु–सत्ता हर समय मार्गदर्शन और सहायता करेगी, यहाँ भी और परलोक में भी ।

फोटो केवल यादगार के लिए रखने चाहिए, न कि सजीव कल्पना करने के लिए। फोटो का ध्यान करते रहने से, कुछ समय बाद, तस्वीर आपके सामने रहने लगेगी, जो ना तो बोलेगी, न ही अंतर में आपका मार्गदर्शन करेगी। इस सहज मार्ग पर मन को स्थिर करना होता है। हर चीज़ स्वाभाविक रूप से और बिना माँगे मिलेगी ।

३५. जीवन के हमारे अधिकतर कार्य और रिश्ते (बंधन) पुराने कर्मों का हिसाब चुकाने के लिए होते हैं। आपका अपने रिश्तेदारों के पास बार–बार जाना भी उनमें से एक था, पर आप इससे चिंतित न हों। क्योंकि अब आप सही मार्ग पर हैं, अतः किसी भी अन्य चीज को महत्त्व न दो।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

शिवानीदीदी : ते ठीक आहे. हे इतरांच्या बाबतीत नाही तर आपल्या बाबतीत आहे. आपण स्वतः ला विचारायला हवं – मला माझं आयुष्य आजपेक्षा अधिक चांगलं करायचं आहे का?'

सुरेश ओबेरॉय : आपल्या मनात भीती बसल्याशिवाय आपण सहसा बदलत नाही. जसं, डॉक्टरनी सांगितलं, तुम्ही अजून एक सिगरेट ओढली तर तुमचा मृत्यू होईल, किंवा जेव्हा आपल्याला सांगितलं जातं, जर तुम्ही पाप केलं तर तुम्ही नरकात जाल. याव्यतिरिक्त बदल करण्यासाठी दुसरी कोणती प्रेरणाच नाही.

शिवानीदीदी : 'भीती' नाही तर 'समज' आपली प्रेरणा असायला हवी. जोवर आपण स्वत:वर काम करत नाही तोवर आपण आनंदाचा अनुभव घेऊ शकत नाही, आपलं शारीरिक स्वास्थ्य सुधारू शकत नाही. आपल्याला आपली नाती जेवढी सुंदर असायला हवी आहेत तेवढी ती सुंदर होणार नाहीत ह्याची जाणीव आपल्याला झाली पाहिजे. आपण हे समजून घ्यायचं की त्याची भीती बाळगायची ते आपल्या

### आनंद, शांती व प्रेम

हातात आहे. आता आपल्याकडे हे ज्ञान आहे आणि दुसऱ्या कोणत्याही प्रेरणेपेक्षा हे जास्त महत्त्वाचं आहे. आपल्याला इतरांसाठी नाही तर स्वतःसाठी बदलायचं आहे; कारण आनंद, शांती आणि प्रेम आपल्याला हवं आहे.

सुरेश ओबेरॉय : मी लहानपणापासून हेच शिकलो आहे की, आयुष्यात शांती आणि आनंद मिळवायचा असेल तर एक कार, बंगला, समाजात प्रतिष्ठा, प्रसिद्धी आणि कुटुंब यांची गरज आहे आणि ही यादी खूपच स्पष्ट आहे.

शिवानीदीदी : हे सगळं आपण मिळवलं आहे आणि त्याचा परिणामही बघितला आहे.

सुरेश ओबेरॉय : आपण आनंद आणि दुःख दोन्हींचा अनुभव घेतो. शिवानीदीदी : तो अनुभव बाहेरून आला नाही तर आपणच तो निर्माण केला. आपल्याला हवी तशी माणसं आणि परिस्थिती होती तेव्हा आपण आनंद निर्माण केला आणि जेव्हा आपल्या आवडीची नव्हती तेव्हा दुःख निर्माण केलं. आता आपण बदलाची निर्मिती करत हे ठरवत आहोत की, परिस्थिती आणि माणसं कशीही असली तरी मला आनंद निर्माण करायचा आहे आणि प्रत्येक अवस्थेत स्थिर राहायचं आहे. कारण भविष्यात आव्हानात्मक परिस्थिती निर्माण होऊ शकते. लोक दिवसेंदिवस अनपेक्षित वर्तन करणार आहेत. आपण आखल्याप्रमाणे परिस्थिती असणार नाही.

मनाची नव्याने आखणी

सुरेश ओबेरॉय : आपण अशा एका जगाच्या दिशेने जात आहोत जिथे सहनशीलता नावालाही नसेल. अर्थात 'झिरो टॉलरन्स' जग असेल.

शिवानीदीदी : परिस्थिती खूप आव्हानात्मक होत जाणार आहे. म्हणजे ती नेहमी तशीच राहणार नाही तर सारखी बदलत राहील. सतत बदलणाऱ्या परिस्थितीवर जर आपली मानसिक अवस्था अवलंबून असेल तर दिवसभरात अनेकदा आपला मूड बदलेल.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

जोश्यांच्या घरातून भांडणाचा आवाज ऐकून बंडोपंतानी घरात डोकावलं...
जोशी दांपत्य भांडत होतं आणि कोचावर दोन माणसं बसली होती....
काय झालं? बंडोपंतानी त्यातल्या एकाला विचारलं...
तो म्हणाला, आम्हालाही माहीत नाही.....आम्ही जनगणना अधिकारी आहोत....
कुटुंबप्रमुख कोण..? नुसतं एव्हढंच विचारलं..

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* युद्धातील शौर्य व बलीदान चक्र कोणास जाहीर झाले होते?

– मेजर सोमनाथ शर्मा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### शेंगदाणे

उपयोग : शेंगदाण्यामध्ये अनेक पौष्टिक घटकांतील प्रथिने, फॉस्फरस, थायामिन, नायसिन हे महत्त्वाचे घटक असल्यामुळे शाळकरी मुले, गर्भवती स्त्रिया व प्रसूती झालेल्या स्त्रिया यांनी शरीर सुदृढ राहण्यासाठी भाजलेले शेंगदाणे व गूळ नियमित खावेत व त्यानंतर एक कपभर दूध प्यावे.

मासिक पाळीमध्ये रक्तस्राव जास्त प्रमाणात होत असेल, तर त्या स्त्रियांनी मासिक पाळीच्या काळात रोज मूठभर शेंगदाणे व थोडासा गूळ खावा. याने रक्तस्राव कमी होऊन अशक्तपणा दूर होतो.

अति स्थौल्याचा त्रास असणाऱ्यांनी मूठभर भाजलेले शेंगदाणे जेवणापूर्वी खाल्ल्यास भूक शमली जाऊन जेवण कमी जाते व आपोआपच वजन हळूहळू कमी होते. कारण शेंगदाणा हा जास्त प्रथिनयुक्त आहार आहे.

४. मधुमेही रुग्णांना 'ब' जीवनसत्त्वाची कमतरता भासत असल्यामुळे त्यांनी रोज मूठभर शेंगदाणे खावेत. यामध्ये असणाऱ्या नायसिनमुळे अशक्तपणा दूर होतो व रक्तवाहिन्यांमधील दोष कमी होतात.

हिरड्या बळकट होण्यासाठी भाजलेल्या शेंगा किंवा शेंगादाणे खावेत. शेंगदाणे चावून खाल्ल्याने दातांजवळील रक्तपुरवठा सुधारतो व त्यामुळे दातांवरचे एनॅमल टिकून राहते. फक्त शेंगदाणे खाल्ल्यानंतर दात स्वच्छ घासून तोंड धुवावे, नाहीतर शेंगदाण्याचे कण अडकून दात किडण्याची शक्यता असते.

रोज भाजलेले मूठभर शेंगदाणे खाल्ल्यास आतड्यांची हालचाल वाढून मल पुढे ढकलण्यास मदत होते व शौचास साफ होते.

रक्त कमी असणाऱ्या स्त्रिया, गर्भवती स्त्रिया व बाळंतिणी यांनी नेहमी रोज मूठभर शेंगदाणे व त्यासोबत गुळाचा खडा किंवा गूळ–शेंगदाणे यांचा रोज एक लाडू खावा.

८. शेंगदाण्यापासून लाडू, चिक्की, खारे शेंगदाणे, चॉकलेट असे विविध प्रकार बनविता येतात. तसेच शेंगा भाजून किंवा उकडूनही खाता येतात.

९. उपवास असेल तर साबुदाण्याएवेजी शेंगदाण्यापासून बनविलेले पदार्थ, तसेच बटाट्यापासून बनविलेल्या पदार्थांचा व फळांचा वापर करावा.

१०. शेंगदाणे भिजत घालून मोड आणून खाल्ल्यास त्रास कमी होऊन ते सहज पचतात व त्यातील पोषणमूल्य व 'ब' व 'क' जीवनसत्त्वे दुपटीने वाढतात.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००




संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान, सावेडी यांच्या वतीने महापौर उद्यान येथे आयोजित 'प्रिशा समर कॅम्प'ला प्रतिसाद मिळाला. (छाया – लहू दळवी)

# मोबाईलपासून दूर जाऊन मुलांनी मैदानी खेळांकडे वळावे

**माजी महापौर बाबासाहेब वाकळे महापौर उद्यानात 'प्रिशा समर कॅम्प'ला प्रारंभ; बालकांमध्ये खेळ व संस्कारांची जोपासना, क्रीडा, संस्कार आणि सांस्कृतिक शिक्षणाचा अनोखा संगम**

नगर – सुदृढ व निरोगी जीवनासाठी मुलांनी बालवयातच मैदानी खेळांची सवय लावणे अत्यंत आवश्यक आहे. आजची मुले ही उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य असून त्यांच्यात योग्य संस्कार आणि क्रीडावृत्ती निर्माण करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी केले.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, टीव्ही आणि डिजिटल साधनांच्या अति वापरामुळे बालकांमध्ये मैदानी खेळांबद्दलची आवड कमी होत चालली आहे. यामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान, सावेडी यांच्या वतीने महापौर उद्यान येथे 'प्रिशा समर कॅम्प'चे आयोजन करण्यात आले असून या शिबिराला उत्साहात प्रारंभ झाला आहे.

या समर कॅम्पच्या माध्यमातून बालकांना केवळ खेळच नव्हे, तर क्रीडा, कला, संस्कृती आणि नैतिक मूल्यांचे धडे दिले जाणार आहेत. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, जिजाऊ मातांचे संस्कार आणि भारतीय परंपरेची ओळख करून देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जाणार आहे.

या शिबिरामध्ये ॲथलेटिक्स, योगा, रोप मल्लखांब, लाठी–काठी, हॉर्स रायडिंग, जिम्नॅस्टिक्स, झिप लाईन, सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग, क्रिकेट, कबड्डी, एरोबिक्स डान्स यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांसोबतच मजेदार खेळ, जादूचे प्रयोग, गोष्टी सांगणे, सहली आणि बालसंस्कार वर्गांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय स्वच्छतेचे महत्त्व, शिस्त, टीमवर्क आणि सामाजिक जबाबदारी याबाबतही बालकांना मार्गदर्शन केले जाणार आहे. या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमास प्रिया शिरोळे, मोनाली कुलकर्णी तसेच बालक, पालक व शिक्षक उपस्थित होते.

# 'पुष्पऋचा'ला राज्यस्तरीय पसायदान उत्कृष्ट कवितासंग्रहाचा पुरस्कार जाहीर



रचना

नगर – महाराष्ट्रातील साहित्य क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या लेखिका रचना यांच्या 'पुष्पऋचा' या कवितासंग्रहाची राज्यस्तरीय पसायदान उत्कृष्ट साहित्य पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर येथील पसायदान प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी राज्यातील उत्कृष्ट साहित्यास पुरस्कार प्रदान करण्यात येतात. रचना यांचा हा पहिलाच कवितासंग्रह असून यापूर्वी या संग्रहास मानाचा शांताबाई शेळके पुरस्कारही प्राप्त झाला आहे. कादंबरी, कथासंग्रह, समीक्षा ग्रंथ आणि अनुवादित साहित्य या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रचना यांच्या साहित्याला आजवर अनेक सन्मान मिळाले आहेत. नुकताच त्यांचा द स्वॅलोज हा अनुवादित कवितासंग्रह रोमानियातील झलाऊ येथे प्रकाशित झाला आहे.

दरम्यान, गुहागर येथील पसायदान प्रतिष्ठानचे हे ११ वे वर्ष असून या निमित्ताने विविध साहित्य प्रकारांतील पाच प्रतिभावंत साहित्यिकांची निवड करण्यात आली असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संयोजक व साहित्यिक डॉ. बाळसाहेब लबडे यांनी दिली.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये स्मृतीशेष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार दिवाकर कृष्ण आचार्य यांच्या पीळ या कादंबरीस जाहीर झाला आहे, तर भारत सासणे उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार अनंता सूर यांच्या खांदे मळणी या कथासंग्रहास प्रदान करण्यात येणार आहे. पसायदान राज्यस्तरीय उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार संयुक्तपणे रचना यांच्या पुष्पऋचा, चंद्रकांत बाबर यांच्या यास्मिन आणि इतर दीर्घ कविता तसेच सोनिया पाटील यांच्या थिजलेल्या माणुसकीचा गहिवर या संग्रहांना जाहीर झाला आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख ३,००० रुपये, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे असून या पुरस्कारांचे वितरण लवकरच पुणे येथे सोहळ्यात होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे, ज्येष्ठ समीक्षक व कवी दा. गो. काळे आणि शब्दघन साहित्य मंचाचे अध्यक्ष सुरेश कंक यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या निवडीबद्दल साहित्याक्षर प्रकाशन, हिंदी अनुसंधान प्रसार केंद्र, अग्रणी साहित्य संस्था देशिंग तसेच शब्बीरभाई शेख, डॉ. संजय बोरुडे, कवयित्री मनिषा पाटील, आशा डांगे, सविता लोंढे आणि मालिका लेखिका सविता करंजकर यांच्यासह साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी रचना यांचे अभिनंदन केले आहे.

# घोणसे ॲकॅडमीच्या ८ विद्यार्थ्यांना गणित विषयात १०० पैकी १०० गुण

नगर – सह्याद्री इंटरनॅशनल ज्युनिअर कॉलेजचा इ. १२ बोर्ड २०२६ मध्येही दणदणीत निकाल लागला असून यंदा एकुण ८ विद्यार्थ्यांना गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त झाले. घोणसे मॅथ्स् ॲकॅडमीचे प्रा. सच्चिदानंद घोणसे यांच्या मार्गदर्शनाखाली आता पर्यंत तब्बल १२१ विद्यार्थ्यांनी गणित विषायत १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात विक्रम नोंदवला आहे. या वर्षी गणितात १०० पैकी १०० गुण मिळवनाऱ्या विद्यार्थ्यांची नावे : जान्हवी भागवत १००/१००, ऐश्वर्या लगड १००/१००, पंकज अडसूळ १००/१००, पार्थ कराळे १००/१००, निरज खेडकर १००/१००, भूषण काटे १००/१००, अभिषेक खंडागळे १००/१००, सत्यप्रताप कुदळे १००/१००.

सह्याद्री कॉलेजच्या गुणवंत विद्यार्थ्यांची नावे. क्षितिका माडजे ९१.१७ टक्के, पायल चौरे ८८.१७ टक्के, संजता मुळे ८७.३३ टक्के, प्रणव कोटलवार ८७ टक्के, तन्मय सातपुते ८६.५० टक्के, उत्कर्ष पोटे ८५.८३ टक्के, प्रणव पायघन ८३.३३ टक्के, आदित्य खेडकर ८२.८३ टक्के, संचिता कोंडेकर ८२ टक्के, तेजस काळे ८०.८३ टक्के, नेहा साठे ८०.३३ टक्के, गौरी बोरूडे ७९.१७ टक्के, साई एकशिंगे ७८.१७ टक्के, ऋषिकेश जज्ञर ७८ टक्के, किरण बेंबडे ७५.५० टक्के, तन्मय उदागे ७७.५० टक्के, यश वाबळे ७६.१७ टक्के, राजनंदिनी अचोले ७५.५० टक्के अशी आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य बाळासाहेब किर्तने, संचालक प्रा. नारायण शिनगारे व प्रा. मनोज पाटील यांनी अभिनंदन केले.

# गवांदे क्लासेसचे तीन विद्यार्थी गणितात राज्यात सर्वप्रथम

**९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे २५ विद्यार्थी; प्रभाकर गवांदे यांच्या मार्गदर्शनाची कमाल**



बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गवांदे मॅथ क्लासच्या वतीने सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

नगर – बारावी बोर्ड परीक्षेत गवांदे मॅथ क्लासच्या तीन विद्यार्थी गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला आहे. मयुरेश शिंदे, प्रणाली कोठुळे आणि श्रद्धा काळे या विद्यार्थिनींनी पैकीच्या पैकी गुण मिळवत राज्यात अव्वल कामगिरी नोंदवली आहे. तसेच या परीक्षेत २५ विद्यार्थ्यांनी शंभर पैकी ९० पेक्षा जास्त गुण मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. सदर परीक्षेत ओमकार तापकीर ९९ माऊली खेमनर ९७, कु.साई होळकर ९६, राजदीप मोराळे ९५, गणेश बावणे ९५, श्रेयस दुतारे ९५, अजय शिंगाडे ९५, शिव चव्हाण ९४, आदित्य कासार ९४, वेदांत डमाळे ९४, ओम ओहळ ९३, कु. तेजस्विनी आमटे ९२, कु.नम्रता मस्के ९२, शिवम वाघ ९१, कु. दिशा जाधव ९१, सत्यम पाचपुते ९०, सुयश पंडित ९०, रोहन फाटके ९०, कु.खुशी गुगळे ९० आणि ओंकार जवक ९० तसेच क्लासेसच्या ५७ विद्यार्थ्यांनी ८० पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत.

JEE (main) म्हणजेच केंद्र सरकारच्या अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेत गवांदे क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहेत. सदर परीक्षेत शुभम मस्के ९७.०९, कु.श्रुती भळगट ९७. ०७, प्रणव घुले ९५.४३, कार्तिक खडके ९४.९०, मयूर पानमंद ९४.४७, ऋतुराज काकडे ९४.५३, यश पावडे ९४.३२, कु. आदिती दासी ९४.३२, पियुष मेघुडे ९३.०८, ओंकार तापकीर ९२.७५, कु. सृष्टी परदेशी ९१.६०, चैतन्य रोकडे ९१.२७, वेदांत कोरडे ९०.१२, कु. संस्कृती वाघ ९०.०४, हरीश वाघ ९०.०१, अशा १५ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. यावर्षी २८ विद्यार्थी JEE (advance) म्हणजेच IIT च्या प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.


प्राध्यापक प्रभाकर गवांदे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही गुणवंत विद्यार्थ्यांची परंपरा कायम राहिली आहे. यावर्षी बारावीच्या गणित विषयात गवांदे मॅथ क्लासच्या तब्बल ४२ विद्यार्थ्यांनी ८० पेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांचा गवांदे मॅथ क्लासच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राध्यापक प्रभाकर गवांदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सांगितले की, गणित विषयातील यश हे सातत्यपूर्ण सराव, वेळेचे नियोजन आणि संकल्पनांची स्पष्ट समज यावर अवलंबून असते. विद्यार्थ्यांनी मेहनत, जिद्द आणि चिकाटी ठेवली तर कोणतेही ध्येय गाठणे शक्य आहे.

# अहमदनगर महाविद्यालयाचे १२ वी बोर्डाच्या परीक्षेत यश

**सायन्स विभागाचा ९१%, कॉमर्स विभागाचा ८५% आणि आर्ट्स विभागाचा ७०% निकाल**



१२ वी बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणारे अहमदनगर महाविद्यालयाचे विद्यार्थी शिक्षकांसमवेत.

नगर – नुकत्याच झालेल्या इयत्ता बारावीच्या फेब्रुवारी–मार्च २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. अहमदनगर महाविद्यालयाच्या सायन्स विभागाचा निकाल ९१%, तर कॉमर्स विभागाचा ८५% आणि आर्ट्स विभागाचा ७०% निकाल लागला आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

यामध्ये विज्ञान शाखेत अनुष्का रंजीत सोज्वळ हिने ८०.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. अनुष्का राम भवनानी हिने ८०.३३% आणि मिहीर बेंजामिन गायकवाड याने ७९.८३% गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

वाणिज्य शाखेत अरमान अली सोहेल अली सय्यद याने ८९.१७% गुण मिळवून महाविद्यालयात तसेच वाणिज्य शाखेत प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. तर ध्रुव महेंद्र खैरनार याने ८५% आणि प्राप्ती यशवंत क्षीरसागर हिने ८४.३३% गुण मिळवून वाणिज्य शाखेत अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

कला शाखेत माही इम्रान तांबोळी हिने ८७% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला, तर उर्वशी रामानंद शर्मा हिने ८५.६७% आणि डोरा विक्रम बार्नबस हिने ८४.१७% गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

बी.पी.एच.ई. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस व सचिव विशाल बार्नबस यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयाच्या आवारात या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रतुल कसोटे, तसेच पर्यवेक्षिका एस. टी. जाधव उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी म्हणाले की, कनिष्ठ महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व प्रकल्पांना प्रतिसाद देऊन विद्यार्थ्यांनी मेहनत आणि कष्टाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांची केवळ शैक्षणिक गुणवत्ता न पाहता त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणून देशासाठी आदर्श नागरिक बनविण्याचे काम केले गेले पाहिजे आणि त्याकडे महाविद्यालयाचा नेहमीच कल असतो. विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय त्यांच्या मेहनतीबरोबरच पालक आणि शिक्षकांनाही देत, हे एक सामूहिक यश असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# न्यू आर्टस् कनिष्ठ महाविद्यालयाचे एच.एस.सी.बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश

नगर – न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाने सन २०२६ च्या एच.एस.सी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून आमच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९९.२८ टक्के लागला असून अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. विज्ञान शाखेत कु.कोठुळे प्रणाली बाबासाहेब हिने ८८.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कॉमर्स शाखेचा निकाल ९१.७० टक्के लागला असून वाणिज्य शाखेत कु.गायकवाड क्षितिजा अर्जुन हिने ९२.३३ टक्के मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला. तर कला शाखेचा निकाल ९२.८९ टक्के लागला असून कला शाखेत कु.सोनवणे तनुजा पांडुरंग हिने ८६.१७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. तसेच एच.एस.सी.व्होकेशनल विभागाचा निकाल ९७.३६ टक्के लागला असून फूड प्रॉडक्ट प्रॉडक्ट ॲण्ड टेक्नॉलॉजीचा विद्यार्थी चि.राम रमेश वाबळे याने ७९.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण शेकडा निकाल ९५.९६ टक्के लागला आहे.

या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, तसेच संस्थेचे पदाधिकारी यांनी विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे अभिनंदन केली आहे.

तसेच या उतुंग यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य प्रा.सौ.कल्पना कानवडे (दारकुंडे), पर्यवेक्षक प्रा. सुभाष गोरे, सर्व शाखेचे समन्वयक व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.



अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, केडगावमध्ये नुकताच 'मेडीप्लस' या फार्मास्युटिकल कंपनीचा कॅम्पस इंटरव्ह्यू (भरती प्रक्रिया) उत्साहात पार पडला.

# अरिहंत फार्मसी कॉलेजमधील 'मेडप्लस फार्मा'चा कॅम्पस इंटरव्ह्यू यशस्वीरित्या पूर्ण; विद्यार्थ्यांची निवड



नगर – येथील अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, केडगावमध्ये नुकताच 'मेडीप्लस' या फार्मास्युटिकल कंपनीचा कॅम्पस इंटरव्ह्यू (भरती प्रक्रिया) उत्साहात पार पडला. या बरोबरच GTT foundation, Barkley यांचा सोबत ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विषयी करार करण्यात आला. या प्रक्रियेत कॉलेजच्या अंतिम वर्षाच्या अनेक विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करत नामांकित कंपनीत रोजगाराची संधी मिळवली आहे.

फार्मसी क्षेत्रातील पदवी आणि पदविका धारक विद्यार्थ्यांना थेट रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे उद्देश आहे. निवड प्रक्रिया आणि प्रतिसाद या कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी मेडीप्लस कंपनीच्या वतीने विजय दहितूले (H. R.Executive, Medplus Pharma), प्रवीण रोकडे (Assistant Manager Medplus Pharma) हे उपस्थित होते. सुरुवातीला कंपनीच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना कंपनीची कार्यपद्धती, भविष्यातील संधी आणि कामाच्या स्वरूपाबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यानंतर लेखी परीक्षा आणि वैयक्तिक मुलाखती (Personal Interview) अशा दोन टप्प्यांत ही निवड प्रक्रिया पार पडली.

कॉलेजचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांचा मार्गदर्शनाखाली व ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.सुधीर गर्जे यांचा सुनियोजित नियोजनामुळे ही प्रक्रिया शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. विद्यार्थ्यांनी तांत्रिक ज्ञानासोबतच संवादाचे कौशल्य उत्तमरित्या सादर केल्यामुळे कंपनीच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले.

# यशस्वी विद्यार्थ्यांमुळे शाळेच्या नावलौकिकात भर पडते

**मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांचे प्रतिपादन : छावनी परिषद शाळेत स्पर्धा परिक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार**



भिंगार – छावणी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेने पुन्हा एकदा विविध स्पर्धा परिक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मंथन प्रज्ञाशोध परिक्षा, लक्षवेध प्रज्ञाशोध परिक्षा, हेडगेवार प्रज्ञाशोध परिक्षा, स्कॉलरशिप परिक्षा, एनएमएमएस आदी परीक्षांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी करत आपला ठसा उमटवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे मार्गदर्शक शिक्षकांचे सातत्यपूर्ण परिश्रम आणि शाळेतील गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण कारणीभूत ठरले आहे, असे प्रतिपादन छावनी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी केले.

या प्रसंगी मनोनित सदस्य वसंत राठोड, स्वच्छता निरीक्षक रमेश साके, गणेश भोर, मुख्याध्यापक संजय शिंदे आदी उपस्थित होते.

या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये आवेज युनूस शेख, ओवी अभय भिंगारकर, यशराज जयदेव हेंद्रे, आईशा मोसिन शेख, हुमेरा हुजैफा शेख, सार्थक संतोष तोरडी, प्रसाद अशोक शेलार, साई प्रसाद कोष्टी, वेदांत संदिप साबळे, भाग्यश्री प्रशांत जोशी, साई प्रशांत कोष्टी, स्नेहल काळू हिले, अम्मारा शेख या विद्यार्थ्यांचा समावेश असून त्यांनी विविध परीक्षांमध्ये उत्कृष्ट गुण प्राप्त करत गुणवत्ता यादींमध्ये स्थान प्राप्त केले आहे.

याप्रसंगी मार्गदर्शक शिक्षक स्नेहल लवांडे, सोन्याबापू लबडे, सीमा गोरे, सुभाष भारूड, मनिषा साठे, आश्विनी यादव यांचाही सत्कार करण्यात आला.

# अहमदनगर विद्यालयाचा बारावीचा निकाल ९०.९० टक्के

नगर – अहमदनगर यतिमखाना संचलित अहमदनगर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (कला शाखा) या विद्यालयाचा फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेचा निकाल ९०.९०% इतका लागला आहे.

या परीक्षेत खालील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

प्रथम: शेख आयेशा आसिफ – ७१.६७%, द्वितीय: शेख सुहाना जहीर – ६०.५०%, द्वितीय: शेख आयेशा नासिर – ६०.५०%

विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अहमदनगर यतिमखाना संस्थेचे चेअरमन हाजी सय्यद अलीमभाई, संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सौ. सय्यद शाहीदा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



खरा संत पश्चाताप करा म्हणून सांगत नाही, तो मुक्ती मिळवून देतो.

## दिनविशेष ०८ मे

१८१७ : देवेंद्रनाथ टागोरफ भारतीय समाजसुधारक आणि तत्त्वज्ञ यांचा जन्म.

१८२८ : हेनरी ूनेंटफ रेड क्रॉस या संस्थेचे सहसंस्थापक यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑक्टोबर १९१०)

१८८४ : हॅरी एस. ट्रूमन अमेरिकेचे ३३ वे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: २६ डिसेंबर १९७२)

१९०६ : प्राणनाथ थापर भारताचे माजी भूसेनाप्रमुख यांचा जन्म.

१९१६ : स्वामी चिन्मयानंदफ यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑगस्ट १९९३)

१९१६ : रामानंद सेनगुप्ता भारतीय सिनेमॅटोग्राफर जन्म. १९७० : मायकेल बेव्हनफ ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू यांचा जन्म.१९८९ : दिनेश पटेल भारतीय बेसबॉलपटू यांचा जन्म. मृत्यू :१७९४ : ॲन्टॉइन लॅव्हाझियेफ फ्रेन्च रसायनशास्त्रज्ञ यांचे निधन. (जन्म: २६ ऑगस्ट १७४३)

१९२० : चिंतामण वैजनाथ राजवाडे पाली भाषा व बौद्ध साहित्य या विषयावरचे अभ्यासक यांचे निधन.

१९५२ : विल्यम फॉक्स फॉक्स थियेटर चे संस्थापक यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८७९)

१९७२ : पांडुरंग वामन काणे भारतरत्न पुरस्कृत यांचे निधन. (जन्म: ७ मे १८८०)

१९८१ : डॉ. केशव नारायण वाटवेफ संस्कृतज्ञ, मराठी कवी यांचे निधन.

१९८२ : कवी अनिल ४० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १९०१)

१९८४ : लीला बेल वालेसफ रीडर डायजेस्ट चे सहसंस्थापक यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १८८९)

१९९५ : भाटिया पत्रकार, संपादक, राजकीय विश्लेषक आणि मुत्सद्दीप्रेम यांचे निधन. (जन्म: ११ ऑगस्ट १९११)

१९९५ : जि. भी. दीक्षित देवदेवतांची आणि संतांची चित्रे यामुळे प्रसिद्ध असलेले चित्रकार यांचे निधन.

१९९९ : श्रीकृष्ण समेळ कलादिग्दर्शक यांचे निधन.

२००३ : डॉ. अमृत माधव घाटगे संस्कृत व प्राकृत विद्वान यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १९१३)

२०१३ : झिया फरिदुद्दीन डागर धृपद गायक यांचे निधन. (जन्म: १५ जून १९३२)


२०१४ : रॉजर एल ईस्टन जीपीएस प्रणाली चे सहसंशोधक यांचे निधन. (जन्म: ३० एप्रिल १९२१)

२०२२ : सुनील कांति रॉय भारतीय व्यवसायिक, पद्मश्री यांचे निधन.

### यंत्र- तांत्रिक क्षेत्रांतील शोध आणि संशोधक

- विमान — राईट बंधू — अमेरिका
- सायकल — मॅकमिलन — स्कॉटलंड
- विद्युत जनित्र — मायकेल फॅरेडे — इंग्लंड
- डिझेल इंजिन — रुडॉल्फ डिझेल — जर्मनी
- रेल्वे इंजिन — स्टीफन्सन — इंग्लंड

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) कुमारिकेचा पुत्र
४) आचडा, झटका
६) सत्वयुक्त
९) रत्न
१०) लक्ष्मी, रमा
११) तांड्यातला माणूस
१३) चामखिळ
१५) प्रांत, वतन
१७) करमणुकीसाठी पाळलेल्या पशुपक्षी
२०) रेडियमचा शोध याने लावला
२३) शिव, शंकर
२४) गर्दीमुळे गलबला होणे
२६) येणे
२७) दंत
२९) खाण्यास प्रतिबंध
३०) आवश्यक कामे सोडून अनावश्यक कामे करणारा
३३) एक भयानक चित्रपट
३५) नाडा
३६) एक संत
३७) दुष्ट मत
४०) कपर्दिका
४१) सिनेतारका
४२) त्रास, कष्ट
४३) अंग मोडून येणे
४५) एक मानवी पदवी
४६) तारुण्याचा पूर्वभाग
४७) तिरपे होऊन खाली पडणे, ढासळणे
४८) न टळू शकणारा

### उभे संकेत

१) अविद्या, अज्ञान
२) योग्य
३) पुटपुटणे
४) बर्फ
५) बॉम्बे (चित्रपट)
६) एक चहा कंपनी
७) केव्हा चा अपभ्रंश
८) साल, वर्ष
१२) अश्व
१४) समुह, जात
१६) बाण
१७) खेळण्याची जागा
१८) हरिणासारखे डोळे असलेली
१९) एक प्राणी
२१) सुटसुटीत दाण्याचे
२२) सनदशीर
२५) ताकद, शक्ती
२८) तृण, गवत
२९) जेष्ठ शु. १५
३०) सोने
३१) कसला
३२) त्रास, कंटाळा
३३) खिडकी, झरोका
३४) अशौच, सुतुक
३८) ध्यान करताना बसण्याची एक विशिष्ट पद्धती
३९) कमर
४०) गाय
४१) अनावश्यक
४२) रुची
४३) घास, मिठी
४४) एक फळ
४५) सीतापती
४६) बोल्ट

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ति | ट | का | रा | | क्रि | या | प | द | | ज | टा | यू |
| र | वा | ळ | | वा | डा | | लं | | ब्र | | | ग |
| म | ळ | व | ट | | मृ | दं | ग | | | सु | गं | ध |
| ल | | ट | | सु | ग | डे | | टा | ळ | | ध | र्म |
| | च | णे | | शि | | लि | व | र | | पु | र्व | |
| ति | | | पा | क्षि | क | | र | ज | | र | | ढ |
| र्थ | | ग | व | त | | | | न | म | स्का | र | |
| प्र | व | च | न | | सां | बा | र | | न | र | क | |
| सा | | का | | सा | ज | | | सा | ध | | मा | ता |
| द | | | द | र | वे | शी | | व | र | मा | ला | |
| | मा | च | | व | ळ | ण | | ध | णी | | | दा |
| मो | ल | क | री | ण | | | वा | | | चा | व | ट |
| ल | क | वा | | | प्र | शं | स | क | | वा | ट | णी |




१) मुंबई जवळील वसई हे ठिकाण खालीलपैकी कशासाठी प्रसिद्ध आहे?
अ)अंगुर ब)केळी क)डाळींब ड)आंबे

२) जास्त पावसाच्या टप्प्यात खालीलपैकी कोणती मृदा आढळते?
अ)तांबडी माती ब)चिकन माती क)गाळाची ड)काळी माती

३) महाराष्ट्रातून एकूण किती राष्ट्रीय महामार्ग जातात?
अ)१२ ब)१४ क)१६ ड)१०

४) खालीलपैकी कोणत्या जिल्ह्याच्या ठिकाणी रेल्वे मार्गच नाही?
अ)वर्धा ब)बीड क)यवतमाळ ड)अकोला

५) जिल्हा नियोजन मंडळाचा अध्यक्ष खालीलपैकी कोण असतो?
अ)मुख्यमंत्री ब)उपमुख्यमंत्री क)जिल्हाधिकारी ड)पालकमंत्री

६) पुणे- नगर सीमेवर खालीलपैकी कोणता डोंगर आहे?
अ)तोरणमाळ ब)गावीलगड क)महादेव ड)हरिश्चंद्र

७) महाराष्ट्रात सर्वाधिककापड गिरण्या कोणत्या जिल्ह्यात आहेत?
अ)नागपूर ब)मुंबई क)सोलापूर ड) नांदेड

८) कालीसरार प्रकल्प कोणत्या दोन राज्यांच्या सहकार्याने उभारला आहे?
अ)महाराष्ट्र- मध्यप्रदेश ब)महाराष्ट्र- गोवा
क)महाराष्ट्र-कर्नाटक ड) महाराष्ट्र- आंध्र

९) चलनी नोटा छापण्याचा कारखाना महाराष्ट्रात कोठे आहे?
अ)मुंबई ब)सोलापूर क)हडपसर ड) नाशिक

१०) तेलगू गंगा प्रकल्प कोणत्या दोन राज्यांच्या संयुक्त सहकार्याने उभारलेला आहे?
अ)महाराष्ट्र- आंध्र ब)महाराष्ट्र- गोवा
क)महाराष्ट्र-गुजरात ड)महाराष्ट्र- कर्नाटक

११) महाराष्ट्रात साहित संस्कृती मंडळाची स्थापना केव्हा करण्यात आली? अ)१९६२ ब)१९६५ क)१९६८ ड)१९८०

१२) महाराष्ट्रातील शैक्षणिक व आर्थिकदृष्टा मागासलेला विभाग कोणता?
अ)विदर्भ ब)खान्देश क)मराठवाडा ड)कोकण

१३) नर्मदा विकास प्रकल्पाचा फायदा महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्याला प्रामुख्याने होतो?
अ)अकोला ब)सोलापूर क)नंदूरबार ड)धुळे

१४) महाराष्ट्राचा पाटबंधारे संदर्भात कोणता आयोग नेमला होता?
अ)वि.स. पागे ब)स.गो. बर्वे क)पी.बी. पाटील ड)वि. म. दांडेकर

१५) देशातील एकूण व्यापारापैकी जवळजवळ किती टक्के व्यापार एकट्या मुंबई बंदरातून होतो? अ)२० ब)२५ क)३० ड)३५

१६) रांजणगावचा अष्टविनायक खालीलपैकी कोणत्या नावाने ओळखला जातो ?अ)चिंतामणी ब)सिद्धीविनायक क)महागणपती ड)बल्लाळेश्वर

१७) महाराष्ट्र शासनाची माहेर हि योजना कशासंबंधी आहे?
अ)विधवा स्त्रीयांसाठी ब)माता-बाल संगोपनाचा एक भाग
क)पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त लोकांच्या पुनर्वसनसाठी
ड) निराधारा स्त्रीयांच्या पुनवर्सनासाठी

१८) महाराष्ट्रातील या प्रसिद्ध ठिकाणी श्रावणात नागपंचमीच्या दिवशी प्रचंड यात्रा भरते?
अ)रामटेक ब)अंबेजोगाई क)बत्तीसशिराळा ड) कौंडण्यपूर

१९) नेवासे हे शहर कोणत्या नदीकाठी वसले आहे?
अ)प्रवरा ब)इंद्रायणी क)गोदावरीड)वर्धा

उत्तर: (१-ब), (२-अ), (३- ब), (४-ब), (५-ड), (६-ड), (७-ब), (८-अ), (९-ड), (१०-अ), (११-अ), (१२-क), (१३-क), (१४-ब ), (१५-ब), (१६-क), (१७-ब), (१८-क), (१९-अ).

## विनोद



वडील-'बेटा, जुगार खेळू नकोस. आज जिंकलास, तर उद्या हरणार, परत परवा जिंकलास, तर पुन्हा हरणार।

मुलगा- 'अच्छा बाबा, असे आहे ना, तर मी एक दिवसआड जुगार खेळेने त्यामुळे मी नेहमी जिंकतच राहणार।'

----------------------

एक मुलगा-' आज मी सात माश्या मारल्या. त्यापैकी चार नर व तीन माद्या होत्या।'

मित्र- (आश्चर्य चकित होऊन) तुला कसे काय कळले की कोणती माशी नर व कोणता मादी?

मुलगा-हे बघ, चार तर बाबांच्या ग्लासाभोवती गुणगुणत होत्या आणि तीन आईच्या आरशावर बसल्या होत्या?

## चिंतन

### शब्द हे शस्त्र आहे जपून वापरा.

शस्त्राने झालेली जखम बरी होते, भरून येते. पण तोंडातून गेलेले जहाल शब्दांचे घाव मनाला घायाळ करतात. जसा धनुष्यातून सुटलेला बाण कधी मागे येत नाही, तसा तोंडातून सुटलेला शब्द परत फिरत नाही. आपल्या बोलण्याने समोरच्याच भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे.

### राष्ट्रे व राष्ट्रचिन्हे


१, भारत - अशोक स्तंभ
२, ऑस्टेलिया - कांगारू
३, आयर्लंड - त्रिदल पान.
४, अमेरिका - सुवर्ण गरुड
५, इराण - गुलाब
६, पाकिस्तान - चंद्रकोर

## चारोळी

पूर्वीसारखीच मी आता
पुन्हा हसू लागले
नात्यांनी दिलेले दु:ख
हळूहळू विसरु लागले.

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे

१) सन २००२ मध्ये आलेला चित्रपट गुनाहचा नायक.
४) आझमी (नायीका)
६) सन १९९८ मध्ये आलेला चित्रपट युगपुरुषची नायीका.
९) शाहरुख खान आणि रानी मुखर्जीचा चित्रपट.
११) छोद दी मैने (चित्रपट)
१३) चटर्जी (दिग्दर्शक)
१४) चंदावरकर (नायीका)
१६) देसाई (दिग्दर्शक)
१९) सन २००१ मध्ये आलेल्या या चित्रपटात अमिताभ बच्चन आणि मनोज वाजपेयी होते.
२०) साधना (गायीका)
२१) स्मिता (नायीका)
२३) जिने की (एक चित्रपट)
२४) सन २००१ मध्ये दिग्दर्शक आशुतोष गोवारीकरच्या या चित्रपटात आमिर खान आणि ग्रेसी सिंह होते.
२५) अनिल कपूर आणि शिल्पा शेट्टीचा चित्रपट.
२६) बागबान या चित्रपटात सलमान खानची नायीका.
२७) मिल गया (चित्रपट)
२८) चोर मचाऐ (चित्रपट)
३०) सन १९८२ मध्ये आलेला चित्रपट अपना बनालोची नायीका.
३१) दिलीप कुमार आणि वैजयंती मालाचा चित्रपट.
३३) सन १९७९ मध्ये आलेला चित्रपट सावन को आने दोचा नायक.

### उभे संकेत

२) या चित्रपटात अमिताभ बच्चन, शाहरुख खान आणि ऐश्वर्या रॉय होते.
३) सन १९९० मध्ये आलेला चित्रपट घायल चा नायक.
४) अभिषेक बच्चन आणि हृषिता भट्ट चा चित्रपट.
५) मधू (नायीका)
६) हम तुमपे है (चित्रपट)
७) सन १९९९ मध्ये आलेल्या या चित्रपटात अमिताभ बच्चन, तब्बु आणि नाना पाटेकर होते.
८) एस.पी. (गायक)
९) करीना कपूरने या चित्रपटात वेश्याची भूमिका केली.
१०) दो रंग (चित्रपट)
१२) सन २००३ मध्ये आलेला चित्रपट जिस्म चा नायक.
१५) अंकुश या चित्रपटाचा नायक.
१७) विरोधी या चित्रपटाचा नायक.
१८) सन २००३ मध्ये आलेल्या या चित्रपटात अर्जून रामपाल आणि ऐश्वर्या रॉय होते.
२२) सन १९९१ मध्ये आलेला चित्रपट पत्थर के फुल चा नायक.
२८) मुदगल (गायीका)
२९) का गुलाम (चित्रपट)
३२) सन १९९३ मध्ये दिग्दर्शक यश चोपडाच्या या चित्रपटात सनी देओल आणि शाहरुख खान होते.

## चिंतन

अस्मिता म्हणते अहंकार किंवा गर्व नव्हे तर स्वकर्तव्याची जाणीव, माणसामध्ये अस्मिता असली पहिजे. शिवाजी महाराजांची ताकद मोगल साम्राज्याच्या मानाने खूपच कमी होती. अस्मितेच्या बळावरच महाराजांनी स्वराज्य निर्माण केले. इंग्रजांना चलेजाव म्हणून सांगणारा महामानवही याच भूमीत निर्माण झाला. पण आज भारतीयांची अस्मिता धूसर होत आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत यावरून देशात बेदिली निर्माण होत आहे. देशाच्या अखंडतेसाठी भारतीयांची अस्मिता जागृत होण्याची आवश्यकता आहे.

## पाक कला

### दही पराठे

साहित्यः एक भाग बेसन, अडीच भाग कणीक (पेला हे माप धरून साहित्य दिले आहे.) तिखट, धने व जिरे पूड प्रत्येकी-एक टी स्पून, हळद-अर्धा टी स्पून, ओवा-पाव टी स्पून, तेल, दही-अंदाजे १॥ ते २ कप.

कृतीः तेल व दही वगळून इतर सर्व जिन्नस परातीत एकत्र घ्यावेत. दहीदेखील पाणी न घालता फेटावे. परातीतील कणीक मळण्यास जेवढे दही लागेल, तेवढे घेऊन, घट्ट गोळा मळावा. एक उंडा लाटून त्यावर तेलाचा हात लावून त्रिकोणी घडी करावी व पोळीहून थोडी जाड पण लहान लाटावी. मग नेहमीप्रमाणे पराठे करावेत.

# १७ मे रोजी उभारणार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार-शिक्षणाची क्रांतिकारी ज्ञानगुढी

## मुंबई उच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निरीक्षणाला दिली जाणार राष्ट्रीय सलामी; पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेचा पुढाकार

नगर – मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या नावाखाली होणारे कर्णकर्कश डीजे, ध्वनीप्रदूषण आणि दिखाऊ शक्तिप्रदर्शन यावर कठोर प्रश्न उपस्थित करत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निरीक्षण नोंदवले आहे. या निरीक्षणाचे पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने स्वागत करण्यात आले असून, त्याला राष्ट्रीय सलामी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर शहरातील दिल्लीगेट परिसरात १७ मे रोजी सकाळी १०.३० वाजता ज्ञानगुढी उभारण्याचा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. ही ज्ञानगुढी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित बौद्धिक आणि वैचारिक चळवळीचे प्रतीक असणार आहे.

न्यायालयाच्या खंडपीठातील न्यायमूर्ती उर्मिला जोशी–फलके आणि न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांनी आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौद्धिक विकास आणि वंचितांचे उत्थान अधिक प्रिय असते. हे निरीक्षण केवळ न्यायालयीन टिप्पणी नसून आधुनिक भारताच्या सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब असल्याचे मत ॲड. गवळी यांनी व्यक्त केले.



ॲड. गवळी पुढे म्हणाले की, उभारण्यात येणारी ज्ञानगुढी ही डीजे संस्कृती, ध्वनीप्रदूषण, दिखाऊ राजकारण, मानसिक गुलामगिरी, अज्ञान आणि अंधानुकरणाविरोधातील वैचारिक प्रतिकाराचे प्रतीक असेल. ही गुढी विवेक, संविधानिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि बौद्धिक क्रांती यांचे प्रतीक म्हणून उभारली जाणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संविधान, वैज्ञानिक दृष्टिकोन, शिक्षणाची क्रांती, स्वाभिमान आणि विचारस्वातंत्र्य दिले. त्यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मूलमंत्र दिला. त्यांनी कधीही गोंधळ, ध्वनीप्रदूषण किंवा दिखाऊ शक्तिप्रदर्शनाचा पुरस्कार केला नाही, असे अधोरेखित करत ॲड. गवळी म्हणाले की, आज अनेक ठिकाणी जयंती उत्सव हे डीजे, फटाके, रस्ते बंद, वाहतूक कोंडी आणि सोशल मीडियावरील प्रसिद्धीपुरते मर्यादित होत चालले आहेत.

संघटनेच्या वतीने असेही स्पष्ट करण्यात आले की, न्यायालयाने उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे – जर एखादा विद्यार्थी अभ्यास करू शकत नसेल, रुग्ण झोपू शकत नसेल, वृद्ध त्रस्त होत असतील, तर हा कोणता सामाजिक न्याय?

ज्ञानगुढी म्हणजे वाचनालये आणि अभ्यासिकांची प्रेरणा, संविधान वाचनाचा संदेश, विज्ञाननिष्ठ चर्चा, गरीब विद्यार्थ्यांना मदत आणि जातीय मानसिकतेविरुद्ध वैचारिक लढा, असे या उपक्रमाचे स्वरूप असणार आहे.

मोठा आवाज म्हणजे मोठा विचार नसतो; डीजे काही तास घुमतो, पण ज्ञान पिढ्यान्पिढ्या घुमत राहते, असा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

शहरातील सर्व समाजघटकांनी या ऐतिहासिक ज्ञानगुढी उभारणी कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा उपक्रम वैचारिक परिवर्तनाकडे वाटचाल करणारा ऐतिहासिक प्रयत्न असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

या अभियानासाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हु सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदी प्रयत्नशील आहेत.

# राजमल मुनोत यांना सभासदत्व बहाल करण्याचे अहमदनगर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँकेला आदेश

नगर – सहकार कायद्यानुसार सर्व तरतुदींचे पालन करीत बँकेचे सभासदत्व मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या राजमल बंकटलाल मुनोत (रा. आगरकर मळा, अहिल्यानगर) यांना सभासदत्व बहाल करण्याचे आदेश अहमदनगर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँकेला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. या प्रकरणात राजमल मुनोत यांच्या वतीने ॲड. अभय ओस्तवाल यांनी युक्तिवाद केला. हा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने बँकेने सभासदत्व नाकारण्यासाठी दिलेली कारणे अग्राह्य ठरवली.

याबाबत अधिक माहिती अशी की, राजमल बंकटलाल मुनोत हे मर्चंटस बँकेचे खातेदार व ठेवीदार असून त्यांनी रितसर शुल्क भरून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २३ अन्वये बँकेच्या सभासदत्वासाठी अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत नामंजूर करण्यात आला. सदर निर्णयाविरुद्ध राजमल मुनोत यांनी सहकार आयुक्त कार्यालयाकडे अपिल दाखल केले. सहकार आयुक्त यांनी सुनावणी अंती मुनोत यांना सभासदत्व देण्याचे आदेश २५.१०.२०१६ रोजी दिले होते. सदर आदेशा विरोधात याविरोधात बँकेने सन २०१७ मध्ये सहकार मंत्र्यांकडे अपिल केले होते. बँकेचे पोटनियम व कायदा असताना सहकार मंत्र्यांनी बँकेचे बाजूने २०.०३.२०१८ रोजी निकाल दिला. या निकाला विरोधात राजमल मुनोत यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात ॲड. अभय ओस्तवाल यांच्या यांच्या मार्फत याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी होऊन दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून न्या. ठोंबरे यांनी १८ एप्रिल २०२६ रोजी निकाल देत राजमल मुनोत यांना सभासदत्व देण्याचे आदेश मर्चंटस बँकेला दिले.

यावर राजमल मुनोत यांनी सांगितले की, एखाद्या पात्र व्यक्तीला कायद्याने सभासदत्व मिळण्याचा हक्क मर्चंटस बँकेचे चेअरमन व संचालक मंडळ, सीईओ कायदा पायदळी तुडवून नाकारत आहेत. हायकोर्टाचा निकाल बँकेला मिळालेली चपराक आहे. या प्रकरणात बँकेने वकिलावर लाखो रुपये खर्च केले आहेत. सदरचे खर्च झालेले पैसे चेअरमन, संचालक मंडळ व सीईओ यांचे कडून वसूल करावेत अशी मागणी राजमल मुनोत यांनी केली आहे.

बँकेचे सभासद राजेंद्र चोपडा यांनी म्हटले की, २५ ते ३० लाख रुपये वार्षिक पगार घेऊन मर्चंटस बँकेचे सीईओ सुनील पुराणिक यांना कायद्याचा अभ्यास, पोटनियम माहिती नसतील तर त्यांनी नोकरी सोडून द्यावी किंवा त्यांना काढून टाकावे. गलेलठ्ठ पगार घेणाऱ्या सीईओ पुराणिक यांनी संचालक मंडळ व चेअरमन यांना खरी कायदेशीर वस्तुस्थिती सांगितली पाहिजे. पण अशा पद्धतीच्या कायद्याचा अभ्यास नसेल तर सीईओची हकालपट्टी केली पाहिजे. सभासदत्व मिळण्यासाठी योग्य नियमाखाली अर्ज करूनही संचालक मंडळ तो अर्ज नियमबाह्य पद्धतीने फेटाळून लावतात. परंतु यापूर्वीही अशाच अनेक प्रकरणात बँकेविरूद्ध निकाल आले आहेत. चेअरमन व संचालक मंडळाला मर्चंटस बँक ही सहकार कायद्यानुसार चालते याचा विसर पडला आहे, अशी टीका राजेंद्र चोपडा यांनी केली आहे.

# महावितरणकडून ३१ वेळा वीज खंडित झाल्याने अहिल्यानगर शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत

## मिनिटांसाठी वीजपुरवठा खंडित झाला तर पाणी उपसा यंत्रणा पुन्हा कार्यान्वित होण्यासाठी लागतो तासभर

नगर – तुम्ही अखंडित वीजपुरवठा द्या, आम्ही शहरवासीयांना पाणी पुरवितो, अशा स्पष्ट शब्दांत महानगरपालिका प्रशासनाने महावितरणला सुनावले आहे. मागील महिनाभरात शहर पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा तब्बल ३१ वेळा खंडित झाल्याने अहिल्यानगर शहराचे जलनियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. वारंवार होणाऱ्या या तांत्रिक व्यत्ययामुळे त्रस्त झालेले मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी महावितरणला पत्र पाठवून वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य उपसा केंद्रांवर १ एप्रिल २०२६ पासून वीजपुरवठ्याचा मोठा खेळ सुरू आहे. मुळानगर, विळद, नागापूर आणि वसंत टेकडी येथील उपसा केंद्रांवर दिवसा आणि मध्यरात्रीही वीज गायब होत असल्याने पाणी उपसा वारंवार बंद पडत आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, उपसा केंद्रांचा वीजपुरवठा काही मिनिटांसाठी जरी खंडित झाला, तरी यंत्रणा पुन्हा पूर्ण क्षमतेने सुरू होऊन पाणी उपसा पूर्ववत होण्यासाठी किमान काही तासांचा अवधी लागतो. सततच्या वीज कपातीमुळे शहरातील जलकुंभ (टाक्या) निर्धारित वेळेत भरता येत नाहीत, परिणामी शहरातील विविध भागांत नियोजित वेळेत पाणी पोहोचवणे अशक्य होत आहे.

महावितरणकडून वारंवार वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे पाणी पुरवठ्याबाबत मोठी अडचण निर्माण झाली आहे. याबाबत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येत आहे. महापालिका प्रशासनाकडून पाणीपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, महावितरणने आपले वीज नियोजन न सुधारल्यास आगामी काळात शहरात तीव्र पाणीटंचाईचे सावट निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### आयुक्तांनी सादर केले वीज कपातीचे रिपोर्ट कार्ड

महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी १ एप्रिल २०२६ पासूनचा वीज कपातीचे सविस्तर रिपोर्ट कार्ड सादर केले आहे. या आकडेवारीनुसार, गेल्या महिनाभरात विळद, नागापूर, मुळानगर आणि वसंत टेकडी या केंद्रांवर तब्बल ३१ वेळा वीज गायब झाली असून, काही ठिकाणी अवघ्या ५–१० मिनिटांसाठी तर काही ठिकाणी ८ ते १० तासांपर्यंत वीज खंडित झाल्याचे वास्तव समोर आले आहे. विळद व नागापूर केंद्रावर १ एप्रिलला तब्बल ४ तास ५० मिनिटे वीज नव्हती, तर ३० एप्रिलला दोन वेळा वीज पुरवठा खंडित झाला. मुळानगर केंद्रावर १, २, ३, ८, १० आणि १८ एप्रिल रोजी विविध वेळेत वीज गेल्याची नोंद आहे. विशेषतः वसंत टेकडी केंद्रावर ११, २३ आणि २९ एप्रिल रोजी दिवसातून तीन–तीन वेळा वीज पुरवठा खंडित झाल्याने मोठी अडचण निर्माण झाली होती. उपसा केंद्राची वीज एकदा गेली की संपूर्ण जलवाहिनी आणि पंपिंग यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी प्रशासनाला प्रचंड कसरत करावी लागते. त्यामुळे शहरातील जलकुंभ वेळेत भरता येत नाहीत, अशी व्यथा आयुक्त डांगे यांनी मांडली आहे.

# मंदिर परिसरातील अतिक्रमणाविरोधात २० मेपासून आमरण उपोषणाचा इशारा



नगर – जामखेड तालुक्यातील मौजे नायगाव येथील श्रीनाथ मंदिर परिसरात वाढलेल्या अतिक्रमणांविरोधात स्थानिक नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली असून, अतिक्रमणे तात्काळ हटविण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

युवराज अर्जुन गायकवाड (रा. नायगाव, ता. जामखेड) यांनी दिलेल्या निवेदनानुसार, श्रीनाथ मंदिर परिसर व ग्रामपंचायत हद्दीत काही व्यक्तींनी अनधिकृतपणे टपऱ्या, दुकाने व इतर बांधकामे उभारून जागा अडवून ठेवली आहे. यामुळे स्थानिक नागरिकांना ये–जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, सार्वजनिक जागेचा वापर मर्यादित झाला आहे.

निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायतीकडून या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष होत असून, उलट काही प्रमाणात अतिक्रमणधारकांना पाठबळ मिळत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने याकडे तत्काळ लक्ष न दिल्यास २० मे पासून पंचायत समिती, जामखेड कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



फिरोदिया शिवाजियन्स, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (ए.डी.एफ.ए.) आणि फर्नांडिस परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ॲलेक्स कप या फुटबॉल स्पर्धेच्या ८ व्या पर्वाला नुकतेच प्रारंभ झाले.

# ॲलेक्स कपच्या ८ व्या पर्वाला उत्साहात प्रारंभ

## भुईकोट किल्ल्याच्या मैदानावर रंगतोय फुटबॉलचा थरार

नगर – फिरोदिया शिवाजियन्स, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (ए.डी.एफ.ए.) आणि फर्नांडिस परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ॲलेक्स कप या फुटबॉल स्पर्धेच्या ८ व्या पर्वाला नुकतेच प्रारंभ झाले.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे संयुक्त सचिव प्रदीप जाधव यांच्या हस्ते तसेच कार्यकारिणी सदस्य राजेंद्र पाटोळे आणि पल्लवी सैंदाणे यांच्या उपस्थित करण्यात आले. यावेळी फिरोदिया शिवाजियन्सच्या गेल्या ३५ वर्षांपासूनच्या जर्सी रंगांचे प्रतीक असलेल्या लाल आणि पांढऱ्या फुगे आकाशात सोडून उद्घाटन करण्यात आले.

ही स्पर्धा स्वर्गीय ॲलेक्स फर्नांडिस उर्फ बाबा यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येत असून, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या स्थापनेपासून सलग ४५ वर्षे त्यांनी संस्थापक सचिव म्हणून काम पाहिले. अहमदनगर जिल्ह्यात फुटबॉलच्या विकासासाठी त्यांचे योगदान अतुलनीय असून ते कायम स्मरणात राहणार आहे. त्यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा घेतली जात आहे.

यंदाच्या स्पर्धेत एकूण १० संघ सहभागी झाले असून, अंतिम सामना ९ मे रोजी खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी फिरोदिया शिवाजियन्सच्या कोअर कमिटी सदस्यांमध्ये अभिषेक सोनावणे, पल्लवी सैंदाणे, सचिन पात्रे, जेव्हिअर स्वामी आणि राजेश ॲंथनी परिश्रम घेत आहेत. तसेच वरिष्ठ खेळाडू अभय साळवे आणि मयूर गोरखा यांनीही मोठे योगदान दिले आहे.

ही स्पर्धा मानद सचिव रोनाप फर्नांडिस यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत असून जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे सदस्य खालिद सय्यद, व्हिक्टर जोसेफ आणि रिशपाल सिंह परमार यांनीही सहकार्य स्पर्धेसाठी केले आहे.

रंगतदार सलामीचे सामने – सलामीचा सामना फिरोदिया शिवाजीयन्स क्लब विरुध्द सॉकर स्कूल यांच्यात झाला. यामध्ये २–० गोलने फिरोदिया शिवाजीयन्स क्लब विजेता ठरला. प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही.

फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी (अंडर–१५ मुले) विरुध्द युनिटी फुटबॉल क्लब यांच्यात झालेल्या सामना शेवट पर्यंत रंगतदार व अनिर्णित राहिला. शेवटी पेनल्टी शूटआऊटमध्ये ३–२ गोलने फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीने विजय संपादन केले.

# 'इलेक्ट्रिकल असोसिएशन'च्या ठेकेदारांचे 'कामबंद आंदोलन' सातव्या दिवशीही तीव्र

## प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजी



नगर – विविध प्रलंबित मागण्या आणि मागील देयके तात्काळ मिळावीत या प्रमुख मागण्यांसाठी सुरू असलेले इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, अहिल्यानगर विभाग यांचे कामबंद आंदोलन आज सातव्या दिवशीही तीव्रतेने सुरूच आहे. राज्यभरातील HT, LT, DTC तसेच इतर सर्व प्रकारची कामे पूर्णपणे बंद ठेवून ठेकेदारांनी आंदोलनाचा पवित्रा कायम ठेवला आहे.

सात दिवस उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस भूमिका किंवा निर्णय घेण्यात आलेला नसल्याने ठेकेदारांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असलेली देयके अद्याप न मिळाल्यामुळे ठेकेदारांवर आर्थिक संकट कोसळले असून कामे सुरळीतपणे चालवणे कठीण झाले आहे, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊन तसेच चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र प्रशासनाकडून केवळ आश्वासनेच मिळाली असून प्रत्यक्षात कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, अशी खंतही व्यक्त करण्यात आली.


Round Robin प्रक्रिया, MO-PO प्रणाली, बिलिंग व पेमेंट सायकल याबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे, तसेच सर्व प्रलंबित देयके तात्काळ अदा करावीत, या आंदोलनाच्या प्रमुख मागण्या आहेत.

दरम्यान, प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन सकारात्मक निर्णय न घेतल्यास येत्या काळात आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांच्या वतीने देण्यात आला आहे.

# धनादेश अनादर प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर – महात्मा फुले मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी, भिंगार, अहिल्यानगर यांना विजय मुरलीधर कुलकर्णी यांनी थकीत कर्जापोटी जामिनदार म्हणून दिलेला धनादेश अनादरीत झाला असल्याने त्यांच्या विरुध्द निगो. इंन्स्ट्रु. ॲक्टचे कलम १३८ अन्वये अहमदनगर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात केस दाखल झालेली होती. सदर केसची अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर यांचे न्यायालयात सखोल चौकशी होवून, पुराव्याअंती व आरोपींतर्फे केलेला बचाव न्यायालयाने ग्राह्य धरुन, सदर प्रकरणातील आरोपीची पुराव्याअभवी निर्दोष मुक्तता केलेली आहे.सदर प्रकरणातील आरोपी यांच्यातर्फे अहमदनगर येथील ॲड. अमित सुरपुरीया यांनी काम पाहिले असून त्यांना ॲड. ए. एस. जाधव यांनी सहकार्य केलेले आहे.

# 'शिक्षक भारती'च्या जिल्हा समन्वयकपदी प्रा. ॲड. शरदराव पवार यांची नियुक्ती




नगर – राज्यस्तरीय शासनमान्य संघटना 'शिक्षक भारती' च्या अहिल्यानगर जिल्हा समन्वयक पदी (माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग) प्रा. ॲड. शरद सुभाष पवार यांची २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी त्यांना अधिकृत नियुक्ती पत्र प्रदान केले.

प्रा. ॲड. शरद पवार हे उच्चविद्याविभूषित असून त्यांनी MA, B.Ed, SET, NET, TET, CTET आणि LLB अशा विविध शैक्षणिक पदव्या संपादन केल्या आहेत. ते अहिल्यानगर जिल्ह्यातील भाग्योदय विद्यालय, भोयरे पठार व भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे कार्यरत आहेत.

# सोहम रेसिडेन्सी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

## चेअरमनपदी किरण म्हस्के, सचिवपदी कविराज बोटे तर खजिनदारपदी सागर धर्माधिकारी यांची निवड



नगर – भिस्तबाग, ढवणवस्ती, तपोवन रोड येथील सोहम रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. यांच्या संचालक मंडळाच्या पदाधिकारी निवडीची सभा नुकतीच उत्साहात पार पडली. निवड प्रक्रियेनुसार चेअरमनपदी किरण साहेबराव म्हस्के, सचिवपदी कविराज चंदर बोटे तर खजिनदारपदी सागर सुनील धर्माधिकारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

ही सभा निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. सुधीर गणपत शेटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सन २०२६–२०२७ ते २०३१–२०३२ या कालावधीसाठी निवडून आलेल्या संचालक मंडळामधून पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आली.

निवड प्रक्रियेदरम्यान चेअरमन, सचिव व खजिनदार या प्रत्येक पदासाठी प्रत्येकी एकच नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाल्याने संबंधित उमेदवारांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

ही प्रक्रिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व संबंधित नियमांच्या अधीन राहून पारदर्शकपणे पार पडल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. यावेळी संस्थेचे संचालक मंडळ उपस्थित होते.

# महिला पोलिसाच्या विनयभंगाच्या गुन्ह्यात आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर – महिला पोलीस कर्मचाऱ्यास सरकारी कामात अडथळा आणून त्यांचा विनयभंग केल्याच्या खटल्यातून आरोपी प्रकाश घोलप याची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. प्रधान जिल्हा न्यायाधीश एस. बी. कचरे यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे.

१८ एप्रिल २०२४ रोजी एका महिला पोलीस कर्मचाऱ्याने कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. कापड बाजार परिसरात एका गुन्ह्यातील आरोपीला ताब्यात घेण्यासाठी जात असताना, भिंगारवाला चौक येथील द्वारकाधीश लस्सी दुकानासमोर ट्रॅफिकमध्ये उभ्या असलेल्या रिक्षा चालकास रिक्षा बाजूला घेण्यास सांगितले. त्यावेळी रिक्षा चालक प्रकाश घोलप याने आपल्याला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून चापट मारली व ओढणी ओढून विनयभंग केला, असा आरोप महिला कर्मचाऱ्याने केला होता. या तक्रारीवरून घोलप विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रधान जिल्हा न्यायाधीश एस. बी. कचरे यांच्यासमोर या खटल्याची सुनावणी झाली. खटल्यात फिर्यादी, साक्षीदार आणि तपासी अंमलदार यांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. आरोपीचे वकील ॲड. सुहास टोणे यांनी उलटतपासणी फिर्यादी महिला कर्मचारी घटनेच्या दिवशी प्रत्यक्षात कर्तव्यावर हजर नव्हत्या, ही बाब पुराव्यानिशी सिद्ध केली. तसेच, फिर्यादीने सांगितलेला संपूर्ण घटनाक्रम संशयास्पद असल्याचे ॲड. टोणे यांनी प्रभावीपणे मांडले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सादर करण्यात आलेले पुरावे पाहता, न्यायालयाने आरोपीविरुद्ध लावण्यात आलेले आरोप सिद्ध होऊ शकत नसल्याचे स्पष्ट करीत त्यांची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात आरोपीच्या वतीने ॲड. सुहास टोणे यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. शिवानी सापिके, ॲड. विलास ढोणे, ॲड. अमित अडागळे, ॲड. ओम गुंड आणि ॲड. अक्षय शिंदे यांनी सहकार्य केले.

# 'म्हातारा पाऊस आणि थडगं' पुस्तकाचे प्रकाशन; नाट्यमहोत्सवालाही उत्स्फूर्त प्रतिसाद



नगर – पुण्यातील 'द बॉक्स' येथे ३ मे रोजी एक साहित्यिक व नाट्यमय सोहळा उत्साहात पार पडला. अहिल्यानगर येथील अभिनेता, दिग्दर्शक आणि लेखक कृष्णा वाळके यांच्या 'म्हातारा पाऊस' आणि 'थडगं' या दोननाटकाचे पुस्तक स्वरूपात प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, अभिनेते नानाभाऊ मोरे आणि निरंजन पेडणेकर तसेच लेखकाचे आई–वडील, नातेवाईक उपस्थित होते.

पुस्तकाचे प्रकाशन होत असताना लेखकाच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि समाधान उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला. विशेष म्हणजे हे त्यांचे पहिलेच पुस्तक असल्याने हा सोहळा संस्मरणीय ठरला. हे पुस्तक शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांनी प्रकाशित केले आहे.

दरम्यान, याच दिवशी 'नाट्यमहोत्सव तुमचा–आमचा' हाही रंगतदार पद्धतीने पार पडला. दिवसभरात पॉपकॉर्न, कॉर्पोरेट कबूतर, भूताचं भविष्य, थडगं आणि लाली अश्या एकूण पाच नाटकांचे सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक नाटकाला प्रेक्षकांचा प्रतिसाद लाभला.

